SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जर्केट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १४.०९.२०२६ | अंक नं. १४१ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

बाप्पाच्या स्वागतासाठी आपण सज्ज व्हा, सजविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत..
गणपती बाप्पाची भरीव मुर्ती
10 ग्रॅम पासुन 1 किलो पर्यंत वेगवेगळ्या वजनामध्ये उपलब्ध.
गणेशोत्सवानिमित्त
खास चांदीमध्ये ताम्हण, ताट, वाटी, मोदक, निरंजनी, समई, कलश, घंटी, दुर्वा, हार, पान, सुपारी, जाणवे, कान, सोंड, बाजुबंद, आकर्षक डिझाईनमध्ये उपलब्ध..
500 पेक्षाही अधिक डिझाईनमधील आकर्षक मुर्ती व दागिने
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

# गंज बाजारात वारंवार अतिक्रमण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

## सराफ बाजार असोसिएशन, व्यापारी व स्थानिक रहिवासी नागरिकांची महापालिका प्रशासनाकडे मागणी

नगर – शहरातील मुख्य बाजारपेठ मधील गंज बाजार परिसरात पुन्हा अतिक्रमण धारक दुकानदार, फळ विक्रेते अतिक्रमण करत आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोऱ्या टांगण्यात आलेल्या असून साहित्य लटकवण्यात आले आहे. काही दुकानदार जाणून-बुजून अतिक्रमण करून पूजेचे साहित्य व इतर साहित्य सार्वजनिक जागेवर टांगत आहेत. यांचे उद्देश सार्वजनिक जागेवर कब्जा मिळवणे तर नाही ना? महापालिकेने यांच्यावर प्रतिदिन पाच हजार रुपये अशी दंडात्मक कारवाई करावी व गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सराफ बाजार असोसिएशन व्यापारी व स्थानिक रहिवासी नागरिक यांनी केली आहे.

याबाबत सराफ बाजार असोसिएशन अध्यक्ष प्रकाश लोळगे व व्यापाऱ्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. यामध्ये त्यांनी म्हंटले आहे की, काही अतिक्रमणधारकांनी तर पाच फूट पुढे लोखंडी साच्यावर साहित्य मांडले आहेत. महापालिकेने या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. चौकामध्ये रस्त्यावर दुचाकी वाहने पण मोठ्या प्रमाणावर लागतात. रस्त्याच्या वळणावर दुचाक्या आडव्या तिडव्या लावण्यात येतात, जेणेकरून हातगाडी ओढणाऱ्या हमालांना माल नेताना त्रास निर्माण होतो.

गंज बाजार चौकातील काही दुकानदार म्हणतात, आमच्याकडे खूप जण कामाला आहे, आम्ही अतिक्रमण करणार, कारवाई झाली की परत अतिक्रमण लावणार. जे कोणी अतिक्रमणधारक व्यापारी अशा प्रकारे विनाकारण नागरिकांना त्रास देण्याचे काम करत असतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे. एकदा जप्त केलेले साहित्य त्यांना परत मनपाने देऊ नये, शनिवार रविवार व सुट्टीच्या दिवशीही अतिक्रमण विभागाने कारवाई करावी.

### पोलीस प्रशासनानेही लक्ष घालण्याची गरज

या अतिक्रमण करणाऱ्यांमुळे नागरिकांना मोठा संताप सहन करावा लागतो. तसेच यांच्या मुळे सराफ बाजारही दिसत नाही. हे अतिक्रमण धारक महिलांना अरेरावी ची भाषा करतात. महिलांना दुचाकी वाहने लावून देत नाही. यांनी सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. या बाबीकडे शहर वाहतूक शाखेने तसेच कोतवाली पोलीस स्टेशन ने ही लक्ष देणे गरजेचे आहे. असे गंभीर प्रश्न जर प्रशासन सोडवत नसेल तर प्रशासनाचा नागरिकांना काय उपयोग?

मनपाने या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन सातत्याने कारवाई करावी गुन्हे दाखल करावे दंडात्मक कारवाई करावी आणि हे प्रश्न कायमचे मार्गी लावावे अशी मागणी सराफ बाजार असोसिएशन, स्थानिक व्यापारी नागरिक व रहिवासी यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री कार्यालय, नगर विकास खाते, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ.संग्राम जगताप, जिल्हाधिकारी, महापालिका पदाधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.




**श्री गणेश आगमनाचा आनंद...** आज श्री गणेश चतुर्थीनिमित्त घरोघरी श्रीगणेशांचे आगमन झाले. सकाळी शहरामध्ये विविध ठिकाणी गणेशमूर्ती आणण्यासाठी अबालवृद्धांची लगबग सुरू होती.

# परीक्षा केंद्रात मोबाईलवर कॉपी करणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

नगर – नगर कॉलेजमधील परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु असताना मोबाईलचा वापर करून कॉपी करणाऱ्या युवकावर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल राजेंद्र ढाकणे असे याप्रकरणी गुन्ह्यात नमूद केलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत छगन रघुनाथ पोकळे (सहायक अधीक्षक, सह दिवाणी न्यायालय, कर्जत) यांनी फिर्याद दिली आहे. २६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या दरम्यान नगर कॉलेजमधील परीक्षा केंद्रावर ही घटना घडली. परीक्षा सुरु असताना आरोपी अमोल ढाकणे याने परीक्षा हॉलमध्ये बेकायदेशीरपणे विनापरवाना मोबाईल बाळगला होता.

परीक्षा कालावधीत त्याने मोबाईलद्वारे प्रश्न सर्च करून कॉपी केली. तसेच प्रवेशपत्रावरील उमेदवारांच्या सूचना क्रमांक सहाचे स्पष्टपणे उल्लंघन केले. न्यायालयाच्या लेखी आदेशानंतर याप्रकरणी १३ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र विद्यापीठ बोर्ड आणि इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये गैरप्रकार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो. नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक अमिना शेख करीत आहेत.

# भरदिवसा घरातून ६ तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

नगर – सावेडी उपनगरातील ढवणवस्ती येथे घरातील दरवाजाचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरांनी १ लाख ५ हजार रुपयांचे ६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी ऋषिकेश सुभाष ढवण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून सायंकाळी सव्वा सहा वाजेच्या दरम्यान ही चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी ऋषिकेश ढवण यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा कशानेतरी तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातून ३० ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, १० ग्रॅमची सोन्याची अंगठी, १५ ग्रॅमचे सोन्याचे पळे व मणी, ५ ग्रॅमचे सोन्याचे कानातील झुबे तसेच चांदीचे करंडे, पैंजण आणि जोडवे असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

घटनास्थळी तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने भेट दिली असून, पोसई योगेश चाहेर व पोहेकॉ दीपक गांगर्ड याप्रकरणी पुढील तपास करत आहेत.

॥ श्री ॥ च्या आशीर्वादाने
लवकरच भव्य श्रीगणेशा
ग्राहक भगिनींच्या प्रेमळ प्रतिसादाच्या पाठबळावर जिल्ह्यातील सर्वोत्तम व भव्य वातानुकूलित कॉस्मेटिक्सच्या प्रशस्त शोरुमचा श्रीगणेशा लवकरच करीत आहोत...
वैयक्तिक अन् व्यावसायिक, सामाजिक जीवनात भूतकालीन अन् गतवर्षीय त्रुटी, दोष चुकांसाठी मन, वचन कायाद्वारे हार्दिक क्षमायाचना करीत आहोत...
उत्सवमूर्ती गणेशोत्सवाच्या मंगलदायी शुभकामना !
बायड परिवार
सर्व नामांकित कंपन्यांचे सौंदर्यप्रसाधने फक्त येथेच..
तन-मनाला खुलविणारे दालन..
महावीर कॉस्मेटिक्स
मोचीगल्ली, अहिल्यानगर
आता लवकरच प्रशस्त वातानुकूलित दालनात स्थलांतर...
Dishan

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

समर्पण चातुर्मास
समर्पण-सर्व कल्याण
आनंद तीर्थ
मिच्छामी दुक्कडम्
वाणी में समरसता, व्यवहार में शिष्टता, क्षमा में उदारता, यह है मानव की पराकाष्ठा!
मन, वचन या काया से, जाने-अनजाने में हुई हर भूल के लिए हम अंतःकरण से क्षमा प्रार्थी हैं।
राष्ट्रसंत आचार्य सम्राट प. पू. आनंदऋषिजी म. सा. की कर्म भूमि पर भक्ति और तप-साधना से महका
'समर्पण चातुर्मास' जहाँ 3600+ अट्ठाई, 11+ मासक्षमण
2.5 करोड़ नवकार मंत्र जाप,
और हज़ारों तपस्वियों की उग्र तपस्या से आनंद तीर्थ का कण-कण धर्ममय हो उठा।
श्री. अशोक (बाबूशेठ) बोरा अध्यक्ष
श्री. आदेश चंगेडिया महामंत्री
श्री. विलास कटारिया कोषाध्यक्ष
समर्पण चातुर्मास समिती, आनंद तीर्थ, अहिल्यानगर
चातुर्मास प्रमुख लाभार्थी
श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा
सौ. राखी, तनिष, तनय, अरिहंत,
श्री. पराग, सौ. सोनम, आरव, श्रेया एवं बोरा परिवार
PMT MACHINES LIMITED
SAURABH BORA GROUP OF COMPANY

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करुन स्वतंत्र रकाना उपलब्ध करून द्या

**काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या शिष्टमंडळाचे राज्यपाल यांना निवेदन**

नगर - देशात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत ओबीसी समाजाची जातनिहाय स्वतंत्र नोंद करण्यासाठी जनगणना पत्रिकेत स्वतंत्र रकाना उपलब्ध करून द्यावा, तसेच ओबीसी समाजाच्या लोकसंख्येची अचूक नोंद करावी, महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत दयावी या प्रमुख मागणीसाठी काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या शिष्टमंडळाने मुंबई राजभवन येथे महाराष्ट्राचे राज्यपाल विष्णूजी देव वर्मा यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. काँग्रेसचे माजी विधानसभा अध्यक्ष आमदार नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले, यावेळी राष्ट्रीय समन्वयक मंगलताई भुजबळ, राष्ट्रीय ओबीसी उपाध्यक्ष भानुदास माळी, विमल कटरे, ॲड. शुभांगी शेरेकर, धनराज राठोड, अनंत मोहोळ, जीवन चाकणकर, श्रावणकुमार रेपणवार, अशोक खलाने, शंभू म्हात्रे, जितेश विशे, विनोद अहिरकर, राजीव गुट्टे, विजय राऊत, शैलेश राऊत, विजय घुटे यांच्यासहीत ३२ ओबीसी पदाधिकारी उपस्थित होते.



ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करुन स्वतंत्र रकाना उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे निवेदन राज्यपालांना देताना काँग्रेस ओबीसी विभागाचे शिष्टमंडळ.

जनगणना प्रक्रियेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना नसल्याबाबत शिष्टमंडळाने तीव्र चिंता व्यक्त केली. अनुसूचित जाती-जमातीप्रमाणे ओबीसी समाजाचीही स्वतंत्रपणे जातनिहाय गणना करणे आवश्यक असून, ओबीसी समाजाच्या हक्कांवर कोणताही अन्याय होऊ नये, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

ओबीसी समाजासोबत मोठा अन्याय होत असून, त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. गावागावांत ओबीसी समाजामध्ये या प्रश्नाबाबत जागृती निर्माण झाली आहे. शासनाने वेळीच दखल घेतली नाही, तर व्यापक जनआक्रोश निर्माण होऊन आंदोलनाची तीव्रता वाढू शकते, असा इशारा शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आला.

केंद्र सरकारने ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेबाबत दिलेला शब्द पाळावा. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना जाहीर केली असली, तरी जनगणनेच्या प्रक्रियेत ओबीसी समाजाची जातनिहाय स्वतंत्र आणि अचूक नोंद होणे आवश्यक आहे. ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना/कॉलम ठेवून प्रत्येक जात व सामाजिक घटकाची लोकसंख्या अधिकृतपणे नोंदवावी, अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या, सामाजिक-शैक्षणिक स्थिती आणि आर्थिक परिस्थितीची अधिकृत माहिती उपलब्ध झाली तरच आरक्षण, शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती, रोजगार, वसतिगृहे, कौशल्य विकास आणि विविध कल्याणकारी योजनांचे योग्य नियोजन करता येईल. जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. बिहार आणि तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रासह देशभरात पारदर्शक पद्धतीने जातनिहाय जनगणना करण्याची मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

यासोबतच विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीकडेही काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने महामहिम राज्यपाल महोदयांचे लक्ष वेधले.

पावसाअभावी पिके करपली आहेत, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, शेतमजुरांच्या हाताला काम नाही आणि जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ- जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना भरीव आर्थिक मदत द्यावी, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने केली.

जातनिहाय लोकसंख्येबरोबरच संबंधित सामाजिक घटकांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी आवश्यक माहिती संकलित करावी.

ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेबाबत केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालये व यंत्रणांकडे महाराष्ट्र राज्याची भूमिका प्रभावीपणे मांडावी. ओबीसी समाजाच्या जातनिहाय स्वतंत्र जनगणना व अधिकृत नोंदणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करून शासनस्तरावर पाठपुरावा करावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## वाडिया पार्क येथून मोबाईल व दुचाकी लांबवली

नगर -अहिल्यानगर शहरातील वाडिया पार्क परिसरातील मोबाईल दुरुस्तीच्या दुकानासमोर एका अनोळखी इसमाने तरुणाचा विश्वासघात करून त्यांच्या ताब्यातील मोबाईल आणि मोटारसायकलचा अपहार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत निलेश राघुनाना जाधव (वय २७, रा. राजवाडा, निभारी, ता. नेवासा) हे १२ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास वाडिया पार्क येथील मोबाईल दुरुस्तीच्या दुकानासमोर गेले होते. यादरम्यान एका अनोळखी इसमाने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांचा रिअल मी कंपनीचा मोबाईल आणि होंडा शाईन (क्र. एमएच १७ सीपी ३३७३) अशी मोटारसायकल असा एकूण मुद्दल माल बळकावून नेला.

या प्रकरणी फिर्यादी निलेश जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास महिला पोलीस नाईक पंडित हे करत असून, आरोपीचा शोध घेतला जात आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील दुबार आरक्षणावर हरकती नोंदवा

**तृतीय सुधारित आराखड्यात १८ प्रकारची आरक्षणे; नागरिकांना कायदेशीर सल्ला व मदतीचे आवाहन**

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेने नगर शहरासाठी तृतीय सुधारित विकास आराखड्याचा ठराव नुकताच सर्वसाधारण सभेत मंजूर केला आहे. या सुधारित आराखड्याचे अवलोकन करताना शहराच्या विकास नियोजनासाठी विविध १८ प्रकारची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आल्याचे दिसून येते. यामध्ये बसस्थानक, दफनभूमी, सामुदायिक सभागृह, शैक्षणिक सुविधा, अग्निशमन केंद्र, उद्याने, आरोग्य सुविधा, ग्रंथालय, वाहनतळ, क्रीडांगण आदींचा समावेश आहे. या विविध आरक्षणांसाठी नगर शहरातील सुमारे ४७९ क्षेत्र आरक्षित करण्यात आल्याचे ॲड. अनिकेत अनिल कुलाळ यांनी सांगितले.



ॲड. अनिकेत कुलाळ

सन २०३९ पर्यंत शहराचा नियोजित विकास व्हावा, हा विकास आराखड्याचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगताना ॲड. कुलाळ यांनी आरक्षणांच्या नकाशांचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज व्यक्त केली. जुन्या व नवीन आराखड्यांची तुलना केली असता काही ठिकाणी पूर्वी आरक्षित असलेले क्षेत्र कमी करण्यात आले असून, काही नवीन क्षेत्रांचा समावेश करण्यात आल्याचे दिसून येते. मात्र, काही ठिकाणी एकाच क्षेत्रावर दुबार आरक्षण करण्यात आल्याचे निदर्शनास येत असल्याचा दावा त्यांनी केला.

पूर्वीच्या आराखड्यात आरक्षित असलेल्या काही क्षेत्रांचे आरक्षणाचे स्वरूप किंवा हेड बदलून त्याच ठिकाणी पुन्हा आरक्षण करण्यात आल्याचे आढळून येत असल्याचेही ॲड. कुलाळ यांनी नमूद केले. त्यामुळे संबंधित भूखंडधारकांनी नवीन व जुन्या आराखड्यांची तुलना करून आपल्या मालमत्तेवर आरक्षणाची पुनरावृत्ती झाली आहे का, याची खात्री करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रारूप विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या नियोजित आरक्षणांबाबत नागरिकांना त्रुटी असल्यास हरकती नोंदविण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार संबंधित नागरिकांनी आपल्या मालमत्तेची कागदपत्रे व आराखड्याची माहिती तपासून विहित मुदतीत हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन ॲड. कुलाळ यांनी केले.

ज्या नागरिकांच्या क्षेत्रावर दुबार आरक्षण झाले असल्याचे आढळून येत असेल किंवा प्रारूप आराखड्यात अन्य काही त्रुटी असल्याचे निदर्शनास येत असेल, अशा नागरिकांना आवश्यक असल्यास कायदेशीर सल्ला व मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असे ॲड. अनिकेत कुलाळ यांनी सांगितले. नागरिकांनी विकास आराखड्याचा अभ्यास करून आपल्या हक्क व मालमत्तेच्या संरक्षणासाठी वेळेत हरकती नोंदवाव्यात, असेही त्यांनी आवाहन केले.



माजी आमदार रमेश कदम यांच्या वक्तव्याचा निषेध करत जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

## माजी आमदार रमेश कदम यांच्या वक्तव्याचा निषेध

### अहिल्यानगर प्रतिमेस जोडे मारो आंदोलन

नगर - रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्याबद्दल माजी आमदार रमेश कदम यांनी अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर रमेश कदम यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे म्हणाले की, रमेश कदम यांनी अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी असलेल्या ३१२ कोटी रुपयांच्या निधीत भ्रष्टाचार केल्याचा आरोप आहे. तसेच, त्यांनी अन्यही अनेक प्रकारचे भ्रष्टाचार केल्याचा आरोप शिंदे यांनी केला. आंबेडकर कुटुंबीयांबद्दल पुन्हा अपशब्द वापरल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला.

या आंदोलनात जिल्हा महासचिव दिलीपराव साळवे, लक्ष्मण साखरे, जिल्हा संघटक गौतम वाघमारे, विठ्ठल वाघमोडे, सोमनाथ साठे, हरीश चक्रनारायण, महिला आघाडीच्या निता भिंगारदिवे, मंगल बरकडे, नेहा जावळे, विवेक विधाते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



डॉक्टर कॉलनी येथे नर्सरी, प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्यांनी एकत्र येत आपल्या श्री बाल गणेश मंडळामार्फत लाडक्या गणपतीची उत्साहात स्वागत मिरवणूक काढली आणि गणपतीची स्थापना केली.

## डॉक्टर कॉलनीतील चिमुकल्यांनी केले लाडक्या गणरायाचे उत्साहात स्वागत

नगर - सुखकर्ता दुःखहर्ता गणरायाचे उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. घरोघरी गणरायाची विधीवत प्राण प्रतिष्ठापना करण्यात आली. बुरूडगाव रोडवरील डॉक्टर कॉलनी येथे नर्सरी, प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्यांनी एकत्र येत आपल्या श्री बाल गणेश मंडळामार्फत लाडक्या गणपतीची उत्साहात स्वागत मिरवणूक काढली आणि गणपतीची स्थापना केली.

कॉलनीतील सर्वच मुलामुलींनी एकत्र येऊन सार्वजनिक मंडळांप्रमाणेच आपल्या छोटेखानी मंडपात आकर्षक सजावट करून गणपतीची प्रतिष्ठापना केली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, गुलालाची उधळण करत मुलांनी गणपती बाप्पा मोरया असा जयघोष केला. रचित मुनोत, अनया लांगोरे, पलक किंजर, कार्तिक किंजर, आयुष पवार, स्वरा म्हस्के, खुशी गाडळकर, काव्या पोटे, स्वराज गाडळकर, अथर्व म्हस्के, अनिशा लांगोरे, आराध्या म्हस्के, विराज हजारे, शाश्वती बोरूडे, इशा पोटे, आराध्या पवार ही मुले मुली या मंडळात आहेत.

मुलांच्या या आनंदात मोठेही तितक्याच उत्साहात सहभागी झाले होते. महाराष्ट्राचा धार्मिक व सांस्कृतिक उत्सव असलेल्या गणेशोत्सवात समाजातील एकोपा वृद्धिंगत होतो. संघभावना वाढते. गणेशोत्सवातील दहा दिवस विविध कार्यक्रम घेण्यात येतात. त्यामुळे लहान मुले, नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळते. या उत्सवाचा निखळ आनंद घेत डॉक्टर कॉलनीतील चिमुकल्यांनी गणरायाचे स्वागत केले आहे. मंडळाने उत्सव काळात विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.

# बीड-अहिल्यानगर-पुणे रेल्वे सुरू करताना नगरची 'तिकीट खिडकी' कमी करू नका

**अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेन असोसिएशनची मागणी**

नगर - बीड-अहिल्यानगर-पुणे रेल्वे सेवा १७ सप्टेंबरपासून सुरू होत असल्याने बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयाबद्दल रेल्वे प्रशासनाचे स्वागत करत असतानाच, नवीन रेल्वे सेवेसाठी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावरील तिकीट खिडकी किंवा कर्मचाऱ्यांची एक शिफ्ट बीड येथे हलविण्याच्या प्रस्तावाला अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेन असोसिएशनने तीव्र विरोध केला आहे. असोसिएशनचे अध्यक्ष हरजीतसिंग वधवा यांनी याबाबत पुणे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे निवेदन देऊन हा निर्णय तातडीने पुनर्विचारात घ्यावा, अशी मागणी केली आहे. निवेदनाची प्रत मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, मुंबई तसेच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनाही देण्यात येणार आहे.





अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर सध्या सकाळच्या वेळेत दोन तिकीट खिडक्या, तसेच संध्याकाळपर्यंत दोन खिडक्या कार्यरत असतात. याशिवाय दिवसभर एक तिकीट खिडकी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत कार्यरत असते. सध्याच्या व्यवस्थेतही प्रवाशांना अनेकदा रांगेत उभे राहावे लागते. अहिल्यानगर स्थानकावर दररोज सुमारे ३५० ते ४०० तिकिटांची विक्री होते, तर विविध सेवांसाठी सुमारे १५० ते १८० तिकिटे दररोज बुक केली जातात. बीड-अहिल्यानगर-पुणे सेवा सुरू झाल्यानंतर प्रवाशांची संख्या आणि तिकीट बुकिंगमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

अशा परिस्थितीत अहिल्यानगरमधील विद्यमान कर्मचारी किंवा एक शिफ्ट बीडला हलविल्यास उर्वरित तिकीट खिडक्यांवर अतिरिक्त भार पडेल. परिणामी प्रवाशांच्या रांगा वाढणे, तिकीट मिळण्यास विलंब होणे आणि तिकीट बुकिंग व्यवस्थेची कार्यक्षमता कमी होणे यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. विशेष म्हणजे अहिल्यानगर रेल्वे स्थानकावरील इंटरनेटचा वेगही अनेक वेळा कमी असल्याने तिकीट काढण्याच्या प्रक्रियेला वेळ लागतो. त्यामुळे उपलब्ध कर्मचारीसंख्या कमी करण्याऐवजी प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे असोसिएशनने म्हटले आहे.

बीडला नवीन रेल्वे सेवा सुरू होत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. मात्र नवीन सेवा सुरू करताना अहिल्यानगरचा कर्मचारी कमी करून बीडला देणे योग्य नाही. नवीन सेवेसाठी नवीन मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. अहिल्यानगरमध्ये सध्या दोन तिकीट खिडक्याही प्रवाशांच्या तुलनेत कमी पडत आहेत. त्यामुळे एक खिडकी किंवा शिफ्ट कमी केल्यास अहिल्यानगरच्या प्रवाशांच्या अडचणी आणखी वाढतील, असे हरजीतसिंग वधवा यांनी सांगितले.

रेल्वे प्रशासनाने अहिल्यानगरची विद्यमान तिकीट व्यवस्था कायम ठेवावी आणि बीडसाठी आवश्यक अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी असोसिएशनने केली आहे. बीडला सुविधा मिळणे हा अहिल्यानगरच्या प्रवाशांचा विरोधाचा विषय नाही. मात्र एका शहराची सुविधा वाढवताना दुसऱ्या शहराची सुविधा कमी करणे योग्य ठरणार नाही. दोन्ही शहरांतील प्रवाशांना समान आणि पुरेशा सुविधा मिळणे हा रेल्वे प्रशासनाचा उद्देश असावा, अशी भूमिका असोसिएशनने स्पष्ट केली आहे.

अहिल्यानगरच्या प्रवाशांच्या मूलभूत तिकीट सुविधेवर कोणतीही कपात स्वीकारली जाणार नाही. हा निर्णय मागे न घेतल्यास अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेन असोसिएशनच्या वतीने प्रवाशांच्या हितासाठी शांततापूर्ण, लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, बीड-अहिल्यानगर-पुणे रेल्वे सेवा सुरू केल्याबद्दल रेल्वे प्रशासनाचे असोसिएशनने आभार मानले असून, या सेवेमुळे बीड आणि अहिल्यानगरच्या प्रवाशांना पुण्याशी अधिक चांगली जोडणी मिळणार असल्याचे नमूद केले आहे.

## इस्माईल अब्दुल तांबोळी यांचे निधन

नगर - धरती चौक येथील रहिवासी इस्माईल अब्दुल तांबोळी (वय ६१) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचा दफनविधी सर्जेपुरा येथील तांबोळी कब्रस्तानमध्ये करण्यात आला.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते वसीम तांबोळी व नवाज तांबोळी यांचे वडील होत. इस्माईल तांबोळी यांनी भूमिलेखन विभागात सेवा बजावून निवृत्ती घेतली होती.

## नितीन दळवी यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील दळवी वस्ती रहिवासी नितीन माधवराव दळवी (वय ४७) यांचे १२ सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, भाऊ, चुलते, १ मुलगा, पुतणे असा परिवार आहे. स्वयंवर मंगल कार्यालयाचे मालक माधवराव धोंडीबा दळवी यांचे ते धाकटे चिरंजीव, मारुती दळवी यांचे पुतणे, सचिन दळवी यांचे बंधू, तर चि. नील दळवी यांचे वडील होत.



# गणेशोत्सवाच्या काळात शिस्त, सुरक्षा आणि स्वच्छता ही आपली जबाबदारी

**पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, श्री विशाल गणेश मंदिरात 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापणा**

नगर - अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत म्हणून विशाल गणेशाची ओळख केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक एकतेचे प्रतिक आहे. मंदिरात होत असलेले कार्यक्रम ही भाविकांना एकत्र आणणारी आणि समाजाला सकारात्मक दिशा देणारी पर्वणी आहे. गणेशोत्सवाच्या काळात शिस्त, सुरक्षा आणि स्वच्छता ही आपली जबाबदारी आहे. भक्तांनी शांततेत आणि आनंदात सण साजरा करावा. पोलिस विभाग नेहमी समाजाच्या सोबत उभा आहे.

अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिरात जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते १४ सप्टेंबर रोजी सकाळी अत्यंत धार्मिक वातावरणात 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना विधीवत पार पडली. मंदिर परिसरात सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी झाली होती. फुलांनी व विद्युत रोषणाईने सजवलेल्या मंदिरात या वेळी सर्वत्र भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते.



विशाल गणपती मंदिरात नगरचे जिल्हा पोलिस अधीक्षक सुदर्शन मुमुक्का व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या हस्ते गणरायाची प्राणप्रतिष्ठा पूजन करण्यात आले.

या सोहळ्यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे, देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा. माणिकराव विधाते, संजय चाफे, नितिन पुंड, शहर पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसें, कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखानाचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्यसह श्री विशाल गणेश सेवा मंडळाचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते.

देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी सांगितले की, ग्रामदैवत श्री विशाल गणेश हे अहिल्यानगरकरांचे आस्थेचे केंद्र आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला मिळालेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ही श्रींच्या कृपेची प्रचिती आहे. समाजाच्या सर्व घटकांनी एकत्र येऊन हा सण मोठ्या उत्साहात व एकतेने साजरा करावा, हेच श्रींचे खरे आशीर्वाद मानले जातील. गणेशोत्सवानिमित्त श्री विशाल गणेश देवस्थान ट्रस्टतर्फे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी रुद्रवंश ढोल पथकाने आपली कला सादर केली.

मंदिर परिसरात फुलांच्या सजावटीसोबतच विद्युत रोषणाईने सजवलेली कलाकृती विशेष आकर्षणाचे केंद्र ठरली. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. महिला व युवक मंडळांनी स्वयंसेवक म्हणून व्यवस्था सांभाळली. संपूर्ण परिसरात गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

# गृहिणी

## आरोग्य

### रक्तातील लोह कसे वाढवावे?

महिलांमध्ये रक्तरंजक द्रव्य कमी होण्याची अनेक कारणे आहेत. दर महिन्याला येणाऱ्या मासिक पाळीमध्ये रक्त जाणे हे प्रमुख कारण आहे. अनेक महिलांना पाळीच्या वेळी जास्त रक्तस्राव होतो त्यामुळे शरीरातील लोहाचे प्रमाण कमी होते. गरोदरपणात आणि बाळाला दूध पाजण्याच्या काळात शरीराला लोहाची गरज दुप्पट लागते आणि आहारातून ती पूर्ण न झाल्यास रक्त कमी होते. बऱ्याच महिला आहाराकडे दुर्लक्ष करतात, वेळेवर जेवत नाहीत, केवळ चहा भाकरी खाऊन दिवस काढतात त्यामुळे लोह, फोलिक आम्ल आणि जीवनसत्वे मिळत नाहीत. पोटात जंत असणे, वारंवार होणारे मूळव्याधीचे दुखणे किंवा चुकीच्या पद्धतीने घेतलेली वेदनाशामक औषधे यामुळे देखील हळूहळू रक्त कमी होऊ शकते.रक्तरंजक द्रव्य वाढवण्यासाठी आहारात बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. रोजच्या जेवणात हिरव्या पालेभाज्या जसे पालक, मेथी, शेवग्याची पाने यांचा समावेश करावा. गूळ, शेंगदाणे, तीळ, नाचणी, राजगिरा, हरभरा आणि मोड आलेली कडधान्ये यातून चांगले लोह मिळते. लिंबू, संत्री, मोसंबी, आवळा, टोमॅटो यासारखी आंबट फळे खाल्ल्याने लोह शरीरात लवकर शोषले जाते. त्यामुळे लोहयुक्त पदार्थ खाताना सोबत लिंबू पिळून खावे. चहा आणि कॉफी जेवणानंतर लगेच घेऊ नये कारण त्यामुळे लोह शोषले जात नाही. रोज सकाळी थोडा वेळ उन्हात बसावे आणि पोट साफ राहील याकडे लक्ष द्यावे. जर सतत थकवा येणे, धाप लागणे, चक्कर येणे, नखे पांढरी पडणे अशी लक्षणे दिसत असतील तर घरगुती उपायांवर अवलंबून न राहता जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. डॉक्टर रक्त तपासणी करून गरजेनुसार योग्य उपचार सुचवतील.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### चॉकलेट मोदक

**साहित्य :** डार्क चॉकलेट कंपाउंड २ वाट्या, मिल्क चॉकलेट कंपाउंड १ वाटी, खवा / मावा १ वाटी, किसलेले सुके खोबरे १ वाटी, पिठी साखर ४ चमचे, बारीक चिरलेले काजू २ चमचे, बारीक चिरलेले बदाम २ चमचे, बारीक चिरलेले पिस्ते १ चमचा, साजूक तूप २ चमचे, व्हॅनिला इसेन्स १/४ चमचा, मोदकाचा साचा

**कृती :** प्रथम चॉकलेट कंपाउंडचे सुरीने छोटे छोटे तुकडे करून घ्या. एका मोठ्या पातेल्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यावर स्टीलचे दुसरे भांडे ठेवून त्यात डार्क आणि मिल्क चॉकलेटचे तुकडे टाका. मंद आचेवर सतत ढवळत चॉकलेट पूर्णपणे वितळवून घ्या. चॉकलेट वितळल्यावर त्यात साजूक तूप घालून एकजीव करा. दुसऱ्या कढईत थोडे तूप घालून त्यात खवा घालून २ ते ३ मिनिटे भाजून घ्या. खवा थोडा थंड झाला की त्यात पिठी साखर, किसलेले खोबरे, काजू, बदाम, पिस्ते आणि व्हॅनिला इसेन्स घालून मिश्रण चांगले एकजीव करा. हे सारण थोडे घट्टसर असावे. आता मोदकाच्या साच्याला आतून तुपाचा हात लावा. चमच्याने वितळवलेले चॉकलेट साच्याच्या आत सर्व बाजूंनी पातळ थर देऊन लावा. हा साचा ५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा म्हणजे चॉकलेटचा कोट घट्ट होईल. फ्रीजमधून साचा काढून त्यात तयार केलेले खव्याचे सारण दाबून भरा. सारण भरल्यावर वरून पुन्हा वितळवलेले चॉकलेट घालून मोदक बंद करा. सर्व साचे भरून झाल्यावर ते ३० ते ४० मिनिटे फ्रीजमध्ये घट्ट होण्यासाठी ठेवा. वेळ झाल्यावर साचा उलटा करून हलक्या हाताने दाब देऊन मोदक काढा. तयार चॉकलेट मोदक हवाबंद डब्यात फ्रीजमध्ये ४ ते ५ दिवस चांगले राहतात. नैवेद्यासाठी वरून थोडे चांदीचे वर्ख किंवा पिस्त्याचे काप लावून सजवा.

## वास्तू

### गणेश मूर्तीची दिशा

✻ मूर्ती थेट जमिनीवर ठेवू नका, एका छोट्या चौरंगावर किंवा पाटावर लाल कापड टाकून ठेवा.

✻ गणपतीची मूर्ती बेडरूममध्ये, टॉयलेटच्या भिंतीला लागून किंवा जिन्याखाली ठेवू नये.

## सौंदर्य

रात्रीसाठी कोरफड जेल + २ थेंब खोबरेल तेल किंवा बदाम तेल मिक्स करून संपूर्ण चेहऱ्यावर आणि मानेवर लावा.

## सल्ला

साखरेला पर्याय म्हणून खजूर सगळ्यात बेस्ट, चिकटपणामुळे लाडू घट्ट होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६

**ऋषिपंचमी, जैन संवत्सरी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, स्वाती १५।२१, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज कामात अनपेक्षित अडथळा येण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आज धनलाभाचे योग आहेत. जुन्या ओळखीतून चांगली बातमी मिळेल.

**मिथुन :** आज प्रवास घडण्याची शक्यता आहे. वेळ चांगला जाईल.

**कर्क :** आज खर्च वाढण्याची चिन्हे आहेत. नातेवाईकांकडून मदत मिळेल.

**सिंह :** आज मान-सन्मान वाढेल. कामाच्या ठिकाणी तुमचे कौतुक होईल.

**कन्या :** आज आरोग्याची थोडी काळजी घ्यावी लागेल. दिवस संमिश्र.

**तूळ :** आज नवीन ओळखी होतील. व्यवसायात फायदा.

**वृश्चिक :** आज जुने वाद पुन्हा उभे राहू शकतात. मनात संभ्रम राहील.

**धनु :** आज भाग्याची साथ मिळेल. अडकलेले काम पूर्ण होईल.


**मकर :** आज मेहनत जास्त करावी लागेल. संध्याकाळी दिलासा मिळेल.

**कुंभ :** आज मित्रांची भेट होईल. दिवस आनंदात जाईल.

**मीन :** आज भावनिक चढ-उतार जाणवतील.

## शब्दगंध क्र. ७५१६

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) सतत; अनवरत; निरंतर ५) अमका; फलाणा ७) नाव देण्याचा विधी; बारसे ८) बंधन ९) लाकूड फोडण्याचे हत्यार १०) गरीब, दीन १२) हर; नीळकंठ; सांब; महादेव १४) भरीव नसलेला; पोकळ; रिता १६) प्रत्येक; महादेव; नीळकंठ; दर १७) ओढा; रोख; झोक १८) वडिलांचा भाऊ; चुलता १९) दीप; दीपक २०) भागीदार; हिस्सेदार २१) रक्तवाहिनी; धमनी; नाडी; शीर

**उभे शब्द :-** २) विनाश करणारे; विध्वंसक ३) एक प्रकारची दारू ३) जुजबी; हलक्या दर्जाचे; कमी स्तरावरील ५) टोकदार; नोकदार ६) दार; द्वार; दरवाजा ८) परंपरेने चालत आलेले ११) हळू; सावकाश; मंद १२) सोबती; मित्र; सहकार्य करणारे १३) जंगलातील वास्तव्य १५) नहर; पाट १८) एक पक्षी; वायस; कावळा १९) दिवस; वासव

**शब्दगंध क्र. ७५१५ चे उत्तर**



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : टीका करणे सोपे आहे, समजून घेणे कठीण आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### झोपेत पडल्यासारखे का वाटते?

आपल्यापैकी अनेकांना झोप लागण्याच्या अगदी पहिल्या क्षणी असे वाटते की आपण जिन्यावरून घसरलो आहोत किंवा आकाशातून खाली कोसळत आहोत. आपण जोरात दचकतो, हातपाय झटकतो आणि डोळे उघडतात. काही क्षण कळतच नाही की काय झाले. हा अनुभव खूप सामान्य आहे. वैद्यकशास्त्रात याला निद्राप्रारंभाचा झटका असे म्हणतात. जवळ जवळ प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात कधी ना कधी हा अनुभव येतोच.

आता हे नेमके का घडते ते समजून घेऊ. आपण जेव्हा जागे असतो तेव्हा मेंदू शरीराच्या प्रत्येक स्नायूवर नियंत्रण ठेवत असतो. जेव्हा आपण झोपायला लागतो तेव्हा मेंदू हळूहळू शरीराला आराम करण्याचा आदेश देतो. स्नायू सैल पडतात, डोळ्यांच्या हालचाली मंद होतात, श्वास लहान होतो. ही झोपेची पहिली पायरी असते. पण कधीकधी या दोन क्रियांमध्ये ताळमेळ बिघडतो. शरीर खूप लवकर सैल पडते आणि मेंदूला वाटते की आपला तोल सुटला आहे, आपण खरोखरच पडत आहोत. आपल्या पूर्वजांना झाडावर झोपताना पडू नये म्हणून ही एक प्रकारची सुरक्षा व्यवस्था शरीराने तयार केली असावी असे मानले जाते. त्यामुळे मेंदू लगेच धोक्याची घंटा वाजवतो आणि सर्व स्नायूंना एकदम आकुंचन पावण्याचा आदेश देतो. त्याचमुळे आपल्याला जोराचा धक्का बसल्यासारखे वाटते.

काही कारणांमुळे हा त्रास वाढतो. जर तुम्ही दिवसभर खूप कष्ट केले असतील आणि शरीर खूप थकले असेल तर झोप एकदम गाढ लागते आणि हा गोंधळ जास्त होतो. मनात सतत विचार, काळजी, भीती असेल तर मेंदू पूर्णपणे शांत होत नाही. झोपण्यापूर्वी चहा, कॉफी किंवा तंबाखूचे सेवन केले तर हृदयाचे ठोके वाढतात आणि झोप उशिरा लागते, त्यामुळे हा झटका येतो. अनेकदा लोक रात्रभर मोबाईल बघत राहतात आणि मग एकदम झोपी जातात, अशा वेळी मेंदूला जागे आणि झोपे मधला फरक कळत नाही. झोपण्याची वेळ रोज बदलणे, रात्री उशिरा जेवण करणे, जास्त आवाज किंवा उजेडात झोपणे या सवयींमुळे देखील हा अनुभव जास्त येतो.

यावर उपाय अगदी सोपे आहेत आणि औषधाची गरज नाही. रोज रात्री एकाच वेळी झोपण्याचा प्रयत्न करा. झोपण्यापूर्वी किमान अर्धा तास डोळ्यांना आराम द्या, कोणत्याही पडद्याकडे पाहू नका. कोमट पाण्याने हातपाय धुवा किंवा कोमट दूध प्या. झोपण्यापूर्वी पाच ते सात वेळा मोठा श्वास घेऊन सावकाश सोडा, यामुळे स्नायू आपोआप सैल होतील. दिवसभरात थोडा व्यायाम किंवा चालणे केले तर रात्रीची झोप शांत लागते. जर तुम्हाला रोजच असे दचकायला होते आणि झोप पूर्ण होत नसेल तर मात्र वैद्यांचा सल्ला घेणे चांगले. पण एखाद्या वेळेस असे झाले तर घाबरून जाण्याचे काहीही कारण नाही, हा आपल्या शरीराचाच एक नैसर्गिक खेळ आहे.


### धीर धरणाऱ्याला यश मिळते

एकदा एका गावात दोन शेतकरी मित्र राहत होते. एकाचे नाव राघव आणि दुसऱ्याचे नाव माधव. दोघांची शेते शेजारी शेजारी होती. दोघांनीही एकाच दिवशी शेतात आंब्याची झाडे लावली.राघवला खूप घाई होती. त्याला वाटायचे झाडाला रोज जास्त पाणी घातले, जास्त खत घातले की आंबे लवकर येतील. तो रोज झाडाची पाने मोजायचा. कधी कधी रागाने फांद्या ओढायचा. आंबे का येत नाहीत म्हणून तो वैतागून जायचा.

काही दिवसांनी त्याने कंटाळून त्या झाडाकडे लक्ष देणेच बंद केले. पण माधव मात्र शांत होता. त्याला माहित होते की आंब्याचे झाड लगेच मोठे होत नाही. तो रोज सकाळी झाडाला थोडे पाणी घालायचा, त्याची काळजी घ्यायचा, पण फळाची घाई करायचा नाही. ऊन असो वा पाऊस तो झाडाची निगा राखायचा. लोक त्याला हसायचे, पण तो शांतपणे आपले काम करत राहायचा.

तीन वर्षे गेली. राघवचे झाड जास्त पाणी आणि दुर्लक्ष यामुळे सुकून गेले. पण माधवच्या झाडाला आता भरपूर मोहर आला होता. काही महिन्यांनी त्याचे झाड गोड आंब्यांनी लगडून गेले. सगळे गाव त्याचे आंबे खायला आले. तेव्हा माधव राघवला म्हणाला, मित्रा झाड असो किंवा आपले ध्येय असो, त्याला वेळ द्यावाच लागतो. घाई केली की काम बिघडते. धीर धरून रोज थोडे थोडे प्रयत्न केले की यश नक्की मिळते.

बोध – घाईने कोणतेही काम होत नाही, धीर धरणाऱ्यालाच शेवटी गोड फळ मिळते.



## आत्मशक्ति

### ध्येय निश्चितीचे महत्त्व

श्वासाचे महत्त्व सांगणारी एक म्हण आहे. प्रत्येक क्षणाचा विचार करा! आम्ही प्रत्येक क्षण कशासाठी खर्च करतो? आम्ही हा क्षण रागासंतापात वा लोभासाठी खर्च करावा का? की आम्ही तो झाल्या गेल्या गोष्टींची अथवा भविष्याची चिंता करण्यात वाया घालविणार? आम्ही ते क्षण व्यर्थ कामांत खर्च करावे किंवा स्वतः ला ओळखण्यासाठी, आयुष्याचे ध्येय गाठण्यासाठी खर्च करावे! ह्या क्षणांचा उत्तम तऱ्हेने उपयोग कोणता असू शकेल? कोणतेही ध्येय डोळ्यापुढे न ठेवता आम्ही ह्या संसाररुपी महासागरांत वाहत जात आहोत.

सद्गुरु संत कृपालसिंगजी महाराजांनी आपल्या आयुष्याला सुरुवात करण्यापूर्वी काही वेळ आपले ध्येय निश्चित करण्यासाठी दिला होता. पुष्कळ विचार करून त्यांनी निर्णय घेतला, प्रथम परमेश्वर व नंतर संसार! त्यांनी स्वतःला जाणून घेण्यासाठी व परमेश्वर प्राप्त करून घेण्यासाठी अग्रक्रम निश्चित केला. हे ध्येय डोळ्यापुढे ठेवूनच त्यांनी आपला मार्ग निश्चित केला व आपले हे ध्येय प्राप्त होईपर्यंत ते कोठेही थांबले नाहीत!आम्ही मोठ्या लोकांच्या जीवनाचा विचार केला, तर लक्षात येते की, ह्या सर्वांनी कोणते ना कोणते ध्येय निश्चित केलेले होते. त्यांच्या निवडी वेगवेगळ्या प्रकारच्या होत्या – कला, विज्ञान, संशोधन किंवा अध्यात्म मार्गाकडे वाटचाल. परंतु त्यांच्यामध्ये एक साम्य होते. ते ह्या कामात उगीचच वाहत जात नव्हते, त्या सर्वांनी आपले लक्ष्य निश्चित केले होते व त्याप्रमाणेच त्यांच्या जीवनाची वाटचाल होती!

शीखांचे नववे गुरु, गुरु तेग बहादुर यांनी एका छोट्याशा खोलीत तप केले. परमेश्वर प्राप्ती होईपर्यंत ते थांबले नाहीत. गौतम बुद्धांनी ज्ञानप्राप्तीसाठी राजसिंहासनाचा त्याग केला. ह्या जगाचा अभ्यास करण्यासाठी, स्वतःचे खरे रूप जाणून घेण्यासाठी व तत्संबंधीत प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी त्यांनी जीवनाची कित्येक वर्षे घालविली.

हजरत महम्मद पैगंबरांनी 'अल्ला' च्या प्राप्तीसाठी किती तरी वर्षे एका गुहेत घालविली. आपली दिनचर्या बदला –जर आम्हाला वास्तविक स्वरुपात आत्म्याचा शोध घ्यावयाचा असेल तर ते ध्येय गाठण्यासाठी काही वेळ काढावा लागेल. आम्हाला माहित आहेच की, आम्ही जीवंत आणि स्वस्थ राहण्यासाठी सहज वेळ काढतो. खाणे-पिणे, झोप, साजशृंगार आणि नोकरीधंदा ह्या कामांसाठी आम्ही आमचा बहुतेक वेळ घालवितो. जो काही

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ऊर्जा

अशाने ती व्यक्ती त्याच चुकीची पुनरावृत्ती करेल. त्यामुळे, तू नेहमीच हे चुकीचं करतोस, असं म्हणण्यापेक्षा आपला हेतू ती चूक सुधारण्याचा आणि भविष्यात टाळण्याचा असायला हवा. त्याचबरोबर, जुन्या संभाषणातील संदर्भ या संवादात आणण्याची गरज नाही कारण आता ते आपल्या नियंत्रणात नाहीत.

सुरेश ओबेरॉय : जर मला टीका करायची सवय असेल तर, त्या सवयीमुळे माझ्या आत प्रचंड गोंधळ निर्माण होईल. आपले विचार आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीवर परिणाम करतात, त्यामुळे माझी तब्येत खालावेल. आणि इतरांकडून मला नकारात्मक ऊर्जा मिळेल.

शिवानीदीदी : जेव्हा तुम्ही माझ्यावर टीका करता तेव्हा त्या नकारात्मक ऊर्जेला प्रथम तुम्ही तुमच्या आत अनुभवता. तुम्ही जे बोललात त्यामुळे जर मी दुखावली जात असेन तर त्या भावनेसाठी मी तुम्हाला जबाबदार ठरवेन. सुंदर नात्यांमध्येही – जिथे कोणीच जाणूनबुजून एकमेकांबद्दल नकारात्मक विचार निर्माण करत नाही तिथेही – एक जण दुखावला गेला तर ती नकारात्मक ऊर्जा ज्या माणसामुळे दुःख निर्माण झालं त्याच्याकडे आपोआपच पोहोचते. त्यामुळे, जेवढा जास्त काळ मला दुःखी वाटेल तेवढा वेळ माझे नकारात्मक तरंग तुमच्यापर्यंत पोहोचत राहतील.

अशा प्रकारे दोन्हींकडे निर्माण होणाऱ्या या भावनांमुळे आत्म्याची शक्ती कमी होण्यासाठी टीका हा सहज मार्ग बनतो.आत्मा स्वतःच दुःख निर्माण करतो हे जरी आपल्याला माहीत असलं तरी त्या वेदनेचं कारण आपण असलो तर आपल्यावरही त्याचा त्वरित परिणाम होईल. ह्या वस्तुस्थितीकडे आपण लक्ष द्यायला हवं आणि लवकरात लवकर उपाय शोधायला हवा. समोरच्या व्यक्तीत चुका काढण्यापेक्षा आणि 'मी बरोबर आहे, तो लवकर दुखावला जातो ही त्याची अडचण आहे,' असा विचार करण्यापेक्षा, गुंता लवकर सोडवायचा प्रयत्न आपण करायला हवा.आपल्यामुळे जेवढा काळ कोणी दुखावलेलं राहील तेवढा काळ आपली बॅटरी डिस्चार्ज होत राहील. याचं कारण, जोवर डिस्चार्ज्ड बॅटरी आपल्याशी कनेक्टेड आहे तोवर आपली शक्तीही कमी होईल.

सुरेश ओबेरॉय : तुमच्यावर टीका करून मी बरोबर केलं आहे, हे जर मला पटलं असेल तर माझी ऊर्जा कमी का होईल?

शिवानीदीदी : हो. कारण मी माझ्या आत दुःख निर्माण करत आहे आणि त्याचे तरंग तुमच्यापर्यंत पोहोचत आहेत.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

झंप्याच्या डाईनिंग रूम मधील छत गळायला लागले

प्लंबर : तुम्हाला कधी कळले ?

झम्या : काल रात्री माझ सूप ३ तास झाले संपेना तेंव्हा

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ ऑस्ट्रेलियाची राजधानी कोणती?

– कॅनबेरा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भसंस्कार केंद्राचे प्रयोजन

मातेला देखील आपले बाळ कसेही, अगदी कुरूप, मतिमंद, अपंग असले तरीही खूप प्रिय असते; परंतु असे बाळ जन्माला आल्यानंतर त्यासाठी माता-पित्यांना जन्मभर त्याच्या वाढीसाठी यातना भोगाव्या लागतात; म्हणून जन्म झाल्यानंतर आयुष्यभर काळजी करण्यापेक्षा जन्माच्या आधीच वर्षभर नियोजनपूर्वक गर्भधारणा होऊ दिली, तर नक्कीच आपल्या हाती सुदृढ, संस्कारयुक्त तेजस्वी, चांगले बाळ जन्माला येईल.'अगं शैला, तू आई होणार आहेस.' असे जेव्हा मी माझी पेशंट शैला हिला सांगितले तेव्हा तिला व तिच्या पतीला खूप आनंद झाला. तिच्या पतीने लगेचच विचारले, डॉक्टर, हिला दवाखान्यात परत तपासण्यास कधी आणायचे? तिला कोणती औषधे द्यावयाची हे आम्हाला सांगा.

बहुतेक वेळा पेशंट किंवा तिच्याबरोबर असणारे नातेवाईक हाच प्रश्न विचारतात; परंतु एवढ्यावरच त्यांची जबाबदारी संपते का? खरं तर तिने कोणता आहार घ्यावयास पाहिजे? तिला शारीरिक व मानसिक आधार कसा द्यावयाचा? कोणती योगासने करावीत? नैसर्गिक सुलभ प्रसूतीसाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत? बाळाची शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ उत्कृष्ट होण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत? अशा प्रकारचे अनेक प्रश्न आतापर्यंतच्या प्रॅक्टिसमध्ये आम्हांला कोणीही विचारलेले नाही. अशा वेळेसच जाणवते की, माता-पित्यांमध्ये ही जाणीव निर्माण होण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. म्हणूनच आम्ही आयुर्वेदिक दुर्वांकुर गर्भसंस्कार केंद्र सुरू केले आहे.

या गर्भसंस्कार केंद्रात आधुनिक विज्ञान, आयुर्वेदशास्त्र व आपली परंपरागत संस्कृती यांचा समावेश केला आहे. गर्भसंस्कार केंद्रामध्ये गर्भधारणेपूर्व काळजी, गर्भावस्थेतील संस्कार व प्रसूतीनंतरचे संस्कार असे तीन टप्पे पडतात. गर्भसंस्कार केंद्रात गर्भपूर्व काळजीमध्ये माता व पिता यांच्या बीजशुद्धीबद्दल मार्गदर्शन केले जाते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



जिव्हेश्वर शिवालयात श्रावण मास निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# जिव्हेश्वर शिवालयात श्रावण मास निमित्त विविध कार्यक्रम

नगर – नगर–सावेडी येथील गावडे मळा,पाईप लाईन रोड येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या निम्मिताने सलग ४ थ्या वर्षी भगवान जिव्हेश्वर शिवालयात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम झाले असल्याची माहिती श्री व सौ वैभव आहेर यांनी दिली

जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पवित्र श्रावण मास निमित्त सकाळीअभिषेक,महाआरती, वृक्षारोपण, बाबा बर्फानी प्रतिकृती, महाप्रसाद करण्यात आले. यावेळी आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष नगरसेवक संपत दादा बारस्कर, सागर मुर्तडकर, संदीप दातरंगे, रोशनी आकाश त्र्यंबके, अभिजित खोसे, सुखदेव शेडाळे, मंगल राजेन्द्र शेडाळे, श्रध्दा राजेंद्र शेडाळे, शिवजीत बलभिमराव डोके, संजय शेळके, बाळासाहेब केरू गेरंगे, महेश कांबळे, विक्रम पाठक, चंद्रकांत शेळके, बाळासाहेब बोराटे, मनोहर कलेक्शन कापड बाजार, मृणालताई कनोरे, मंदाताई पिंपरकर, सोमनाथ खाडे, प्रकाश मारवाडे, शुभम झिंजे, अमित खामकर, आयोजक वैभव आहेर, सौ योगिनी आहेर आदींसह नर्मदेश्वर गृप, बेलेश्वर ग्रुप, जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ, समाज संस्थाचे मान्यवर तसेच मोठ्या संख्येने भाविक, समाज बंधूभगिनी उपस्थित होते

जगताप म्हणाले हा सोहळा समाजाला एकत्र आणणारा, पर्यावरणाप्रती जागृत करणारा आणि संस्कृतीचे जतन करणारा ठरला आहे अशा उपक्रमांमुळे समाज अधिक सुसंस्कृत आणि निसर्गाशी जोडला जातो. आयोजक आणि कार्यकर्त्यांचे नियोजन अतिशय नेटके आणि कौतुकास्पद होते. तसेच या कार्यक्रमात बालघर आश्रमातील मुलांचा एक विशेष जाहीर मानसन्मान करण्यात आला मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे हा या मागचा मुख्य उद्देश साधला गेला आहे

कार्यक्रमा निमित्त मंदिरामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती तर यावेळी प्रमुख आकर्षण बाबा बर्फानी अमरनाथ (भव्यदिव्य बर्फाचे शिवलिंग) व मंदिर गाभारा सजावट हे भाविकांसाठी मुख्य आकर्षण आणि मनमोहक दृश्य होते. यामुळे संपूर्ण परिसरात अमरनाथ गुहेसारखे पवित्र वातावरण निर्माण झाले. तसेच राधिका गृप यांच्या भजनाच्या सुरांनी वातावरणात भक्तीरस निर्माण केला. केवळ धार्मिक विधींवर मर्यादित न राहता वृक्षारोपण सामाजिक संदेश देऊन करून वैभव आहेर यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्याचा मोठा संदेश दिला आहे. ही काळाची गरज असून एक उत्तम सामाजिक पाऊल आहे, असे प्रतिपादन महेश कांबळे यांनी केले

यावेळी संपत बारस्कर यांच्या हस्ते त्यांच्याच प्रेरणेने आंब्याची मोठी रोपे मंदिर परिसरात लावण्यात आली. कार्यक्रम संपल्यावर सर्वासाठी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता त्याचा लाभ असंख्य भाविकांनी घेतला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आहारशुद्धी

संकलन: दिशान फिचर्स




तुम्हाला हवी ना बुद्धी? मग त्यासाठी का घ्यायची औषधी? त्यासाठी युक्ती साधी. फक्त काय खाता याचा विचार करा आधी. किती व कितीदा खाता याचा तरी विचार केला का कधी? खाण्यापायी शरीराला जडू नये व्याधी. अवेळी झोपेची चिकटू नये उपाधी.

ज्यांचे मन शुद्ध, तोच खरा प्रबुद्ध. अभक्ष भक्षण हे पशुंचेच लक्षण. नको खाणे, त्याने मन गढूळ होणे. मग बुद्धी देखील गंजणे, पाठांतर विसरणे, योग्य ते दाखले वेळेवर न आठवणे, खाल्ले तिखट, आंबट, उग्र आणि तेलकट, की मागे लागलीच दुर्बुद्धीची कटकट माणसाचा आहार, शाकाहारी आणि मितप्रणामी असावा. तरीच निर्भयपणा यावा. आहार समतोल, त्याचे विचार अनमोल. आंबट, तिखट, गोड, कडवट, खारट, तुरट हे सगळे समप्रमाणात व पचेल त्या स्वरुपात नित्य खावे. मग शतायुषी व्हावे. नावलौकिक मिळवावे हीच आहे उपनिषदांची शिकवण.

तुकाराम महाराजांच्या काळी यंत्रमार्गाचे स्तोम माजले होते. शाक्तपंथी म्हणून या तंत्रमार्गी लोकांना शाक्तपंथात, पंचमकाराचे सेवन सक्तीचे होते. मांस, मद्य, मीन, मीनाक्षी व मृगया यांचे सतत सेवन कराया हा पंथ सांगे. या अभक्ष भक्षणकारी व विषयासक्त शिकारी शाक्तपंथीयांना तुकोबा गधडा म्हणतात.

जगातील विचारवंत तर म्हणतात, माणूस अभक्ष भक्षण किंवा मद्यप्राशन न करतादेखील मुळातच उद्धट व विक्षिप्त वागतो. मग ही खाण्या पिण्याची भर पडल्यावर तर विचारायलाच नको? बेताल वागणे हे माणसाच्या प्रकृतीतच असणे, पण वृत्तीचा समतोल राखणे, हे मात्र प्रयत्नपूर्वक साधणे एक कहाणी आहे मजेदार.

एक होता मानसशास्त्रज्ञ. तो विक्षिप्त लोक कसे असतात. ते विद्यार्थ्यांना वर्णन करुन सांगायचा. त्या शास्त्रज्ञाचा एक दवाखानाही होता. तिथे तो अशा विक्षिप्त माणसांवर उपचारही करायचा. विद्यार्थ्यांनाही प्रात्यक्षिके दाखवायचा. विद्यार्थी रोज अशी विक्षिप्त माणसे पाहत.

एकदा ते विद्यार्थी त्या शास्त्रज्ञाला म्हणाले, तुम्ही आम्हाला रोज अशी वेडी माणसे दाखवता. त्यांचे बोलणे वागणे वर्णन करता आणि प्रत्यक्ष अनुभवही देता. तुम्हाला काय असे सगळे विक्षिप्त वेडेच भेटतात. कुणी साधा समतोल विचाराचा माणूस भेटतंच नाही कधी.

शास्त्रज्ञ म्हणाला, नाही अद्याप मला तरी भेटला नाही.. सर, आम्हाला भेटला तर ?

शास्त्रज्ञ म्हणाला, वा वा, उत्तम. एखादा भेटलाच असा साधा समतोल विचाराचा सामान्य माणूस, तर त्याला ताबडतोब माझ्याकडे आणा। आठ दिवसांत करतो मी त्याला दुरुस्त ।।

म्हणूनच म्हटलंय, की आजकाल विकृतीच प्रकृती झाली आहे. त्यातच आहारशुद्धी न उरल्याने सारेच आणखी कठीण बनले आहे.

– किशोर गांधी

# ‘फिजिकल’ सुनावणी कमी होऊन भविष्यात ‘ऑनलाइन न्यायप्रक्रियेकडे’ कल वाढणार

**मुकेश शर्मा यांचे प्रतिपादन; ग्राहक आयोगाची सुनावणी आता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे; अहिल्यानगरचा राज्यात पहिला मान**

नगर – ग्राहक आयोगामध्ये वाढत्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी प्रक्रिया ही काळाची गरज बनली आहे. वाढत्या तक्रारी आणि अपुरे मनुष्यबळ याची सांगड तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडविता येणार आहे. अहिल्यानगर जिल्हा सर्वात मोठा असून, विविध तालुक्यांतून सुनावणीसाठी येणे पक्षकार व वकिलांना काही वेळा शक्य होत नाही. अशा परिस्थितीत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी शक्य होणार आहे. भविष्यात हळूहळू फिजिकल सुनावणी कमी होऊन ऑनलाइन सुनावणीकडे सर्वांचा कल राहणार असल्याचे प्रतिपादन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांनी केले.

ग्राहकांच्या तक्रारींच्या सुनावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी सेवेचा शुभारंभ राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. टीव्ही सेंटर येथील प्रशासकीय इमारतीतील ग्राहक आयोगाच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग (मुंबई) सदस्या पूनम महर्षी, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्या चारू डोंगरे, संध्या कसबे, रजिस्ट्रार कविता कोमार, ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील मुंदडा आदींसह वकील बांधव व ग्राहक वर्ग उपस्थित होते.

पुढे बोलताना मुकेश व्ही. शर्मा म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हास्तरावरील ग्राहक आयोगामध्ये सर्वात प्रथम आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी प्रक्रिया घेण्याचा मान अहिल्यानगरला मिळाला आहे. अशा पद्धतीने राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये ही सुविधा सुरू करण्याचा मानस आहे. मात्र, या नियोजनापूर्वीच अहिल्यानगर जिल्हा ग्राहक आयोगाने स्वतःहून पुढाकार घेतला. मुंबई बेंचप्रमाणे येथे सेटअप करण्यात आल्याचे त्यांनी विशेष कौतुक केले.



अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी सेवेचा शुभारंभ करताना राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा आदी.

प्रास्ताविकात ॲड.सुनील मुंदडा म्हणाले की, अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने व्हिडिओ कॉन्फरन्स सुनावणीद्वारे राज्यात एक वेगळा ठसा उमटविला आहे. शोषित, पीडित ग्राहकांच्या समस्या सोडविणे हेच ध्येय ठेवून कार्य सुरू आहे. कमीत कमी खर्चात आणि जलद स्वरूपात ग्राहकांना न्याय देण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्या चारू डोंगरे म्हणाल्या की, सहकारी वर्ग आणि सर्व वकिलांच्या सहकार्याने जिल्हा ग्राहक आयोगामध्ये उत्तमपणे कार्य सुरू आहे. ज्येष्ठ वकील आणि पक्षकारांना सुनावणीसाठी लांबून येणे शक्य होत नाही. यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद यांनी पुढाकार घेऊन व्हिडिओ कॉन्फरन्स सुनावणीसाठी महत्त्वाचे योगदान दिले असून, ही सुविधा कार्यान्वित केली आहे. याचा सर्वाधिक लाभ ग्रामीण भागाला होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग (मुंबई) सदस्या पूनम महर्षी म्हणाल्या की, खेड्यापाड्यांपर्यंत न्यायव्यवस्था पोहोचविण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरणार आहे. वेळ महत्त्वाचा असून, सर्वांना लांबून वेळेत हजेरी लावता येत नाही. लांब असलेले, येणे शक्य नसलेले, आजारी असलेले तसेच विविध कारणांमुळे सुनावणीसाठी उपस्थित राहू न शकणाऱ्या व्यक्तींना यापुढे न्यायापासून वंचित रहावे लागणार नाही. व्हिडिओ कॉन्फरन्स सुनावणीद्वारे न्यायप्रक्रियेत गतिमानता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात ज्येष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शहर बार असोसिएशन उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, सेंट्रल बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. फारुख शेख, सचिव ॲड. अभिजीत देशपांडे, कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिवाजी कराळे, ॲड. रविंद्र बेद्रे, ज्येष्ठ वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. अशोक बंग, ॲड. शिरीष जोशी, ॲड. शिरीष गटने, ॲड. किशोर राऊत, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे उपाध्यक्षा ॲड. गिरिजा गांधी, सदस्य ॲड. योगेश कुलकर्णी, ॲड. तांबोळी, ॲड. अरुणा राशीनकर, ॲड. सुजाता कुमार, ॲड. संदीप मुळे, ॲड. शुभ्रा तांबोळी, ॲड. भावना नय्यर–आहुजा, ॲड. अंजली सरोदे, ॲड. सिद्धार्थ वाघमारे, ॲड. आदित्य घालमे, ॲड. कैवल्य उपासनी, ॲड. रणजीत टाकते, ॲड. संदीप वाघ, ॲड. फैजान बेग, ॲड. विलास कोतकर, ॲड. नितेश बनबेरु, ॲड. हरीश कल्याणी उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड.शुभांगी बाबर यांनी केले. आभार ॲड.सिद्धांत गांधी यांनी मानले.

### आभासी सुनावणीद्वारे सेवेचा शुभारंभ

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांनी फित कापून तसेच प्रत्यक्ष व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेऊन आभासी सुनावणी सेवेचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स यंत्रणेचे बारकावे तपासले. या सुविधेमध्ये आणखी योग्यता आणण्यासाठी त्यांनी आवश्यक सूचना केल्या. तसेच उपस्थित वकिलांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेतले.



विहिंपचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी भांबरकर परिवाराची सांत्वनपर भेट घेतली.

# विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी घेतली भांबरकर परिवाराची सांत्वनपर भेट

नगर – कल्याण रोड, गणेशनगर येथील विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर व एस.टी.बस चालक सतीश भांबरकर यांच्या ज्येष्ठ भगिनी कु. प्रमिला भांबरकर यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांची विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी सांत्वनपर भेट घेतली.

स्व. कु.प्रमिला भांबरकर यांनी डॉ.देशपांडे हॉस्पिटल व डॉ.तांबोळी हॉस्पिटलमध्ये २५ वर्षे परिचारिका नर्स म्हणून सेवा केली. आरोग्य सेवेच्या कार्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

यावेळी शंकर गायकर म्हणाले, सेवा परमो धर्म, मनुष्य सेवा करणे हाच खरा धर्म आहे. या प्रमाणे सेवाभाव वृत्तीने आरोग्य सेवेचे केलेले कार्य महान आहे. स्वर्गीय प्रमिला भांबरकर यांचे कार्य प्रेरणादायी आहे. भांबरकर परिवाराला या दुःखातून सावरण्याची ईश्वर शक्ती देवो.

याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, भारतीय मजदूर संघाचे प्रदीप भाटे, मयूर राजपुरोहित, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे सहप्रमुख हरिभाऊ डोळसे, निसर्गसृष्टी गौशाळेचे गौतम कराळे, सुरेंद्र सोनवणे, भाजपचे मुकुल गंधे, भारतीय किसान संघाचे जिल्हाप्रमुख निलेश चिपाडे, आदी उपस्थित होते.

# कार्यकारी अभियंता अंकुश पालवे यांना महाराष्ट्र शासनाचा ‘उत्कृष्ट अभियंता’ पुरस्कार जाहीर



नगर – भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या अभियंता दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश अशोकराव पालवे यांना सन २०२५–२६ करिताचा मानाचा ‘उत्कृष्ट अभियंता’ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. वैयक्तिक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून, हा पुरस्कार २९ सप्टेंबर रोजी मुंबई येथे प्रदान करण्यात येणार आहे.

अंकुश पालवे यांनी आपल्या १८ वर्षांच्या शासकीय सेवेत उत्कृष्ट रस्ते, पूल, इमारती तसेच विविध विकासकामांमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. समाजाला डोळ्यासमोर ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कामातील गुणवत्ता, नियोजनबद्ध अंमलबजावणी व कमी कालावधीत विकासकामे पूर्ण करण्याची कार्यशैली यामुळे त्यांच्या कामाची शासनाने दखल घेतली आहे.

अंकुश पालवे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यकारी अभियंता म्हणून काम करताना आठ वर्षांपासून रखडलेले जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे काम विशेष प्रयत्न करून अवघ्या एका वर्षात पूर्ण केले. एडीबी अंतर्गत सिद्धटेक–कोर्टी रस्त्याच्या कामासाठी विशेष प्रयत्न करून कमी कालावधीत परवानगी मिळवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. विशेष म्हणजे या रस्त्याला राज्यातील ‘उत्कृष्ट रस्ता’ म्हणूनही गौरविण्यात आले आहे.

दोन वर्षांच्या कालावधीत नियोजन व निविदा प्रक्रियेसह किमान २०० कोटी रुपयांच्या इमारतींची बहुतांश कामे पूर्णत्वास नेण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला. अहिल्यानगर येथील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, नवीन व्हीआयपी शासकीय विश्रामगृह, मुख्य न्यायालयीन निवासस्थाने, महसूल भवन, पाथर्डी तहसील कार्यालय, कर्जत व जामखेड येथील शासकीय रुग्णालये व विश्रामगृह इमारती, पारनेर तालुका न्यायालय इमारत तसेच आदर्श गाव हिवरे बाजार येथील प्रशिक्षण संकुल टप्पा दोन या कामांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कोविडच्या काळात १०० घाटांच्या तात्पुरत्या रुग्णालयाची उभारणी करण्यासाठीही त्यांनी विशेष योगदान दिले.

अंकुश पालवे यांच्या कार्यकाळात कोंभळी–कर्जत–राशीन मार्गावरील अनेक वर्षे रखडलेली व वादग्रस्त कामे स्थानिक व प्रशासकीय पातळीवर सर्वांशी समन्वय साधून पूर्ण करण्यात आली. सुमारे सात वर्षे रखडलेले काम मार्गी लागले. शेवगाव–पैठण रस्ता, शेवगाव–मिरी–नगर रस्ता, पैठण ते मोहटादेवी नवीन मार्गाचा प्रस्ताव, पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी परिसरातील दुर्गम वाड्या–वस्त्या जोडण्याचे काम तसेच नगर–मनमाड रस्त्यावरील बाभळेश्वर व देहरे येथील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे टोलनाके बंद करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न व मोठा कागदी तसेच न्यायालयीन लढा दिला.

राहुरी तालुक्यातील तास आंग्रेवाडी येथील मुळा नदीवरील दोन तालुक्यांना जोडणाऱ्या मोठ्या पुलाचे बांधकाम केवळ १८ महिन्यांत बचतीसह पूर्ण करण्यात आले. या पुलामुळे नागरिकांच्या सुमारे ४० किलोमीटर अंतराची बचत झाली. निमगाव गांगर्डा येथील सीना नदीवरील मोठा पूल, सामनगाव येथील ढोरा नदीवरील मोठा पूल तसेच इतर विविध पुलांच्या कामांमध्येही त्यांचे योगदान राहिले.

राहुरी तालुक्यातील ताहराबाद या दुर्गम भागातील रखडलेले व वादग्रस्त ग्रामीण रुग्णालयाचे काम विशेष प्रयत्न करून केवळ दोन वर्षांत पूर्ण करून ते कार्यान्वित करण्यात आले. नंदुरबार जिल्ह्यात कार्यरत असताना आदिवासी बहुल व आकांक्षित जिल्ह्यातील दुर्गम वाड्या–पाड्यांसाठी ‘साकव’ ही अभिनव संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यात आली. केवळ सहा महिन्यांत किमान नऊ साकवांचे बांधकाम पूर्ण करून आदिवासी बांधवांची गैरसोय दूर करण्यात आली.

नंदुरबार जिल्ह्यातील सावळदे–रनाळा–शनी मांडळ या एडीबी अंतर्गत मोठ्या रस्ते प्रकल्पाचे काम शून्यापासून सुरू करून अंतिम टप्प्यात आणण्यातही त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. सध्या नंदुरबार जिल्ह्यात कार्यरत असताना केवळ एका वर्षात किमान दहा मोठ्या इमारतींची कामे पूर्ण करण्यात आली. यापैकी पाच इमारती २६ जानेवारी २०२६ रोजी एकाच दिवशी हस्तांतरित करण्यात आल्या.

नंदुरबार जिल्ह्यातील महत्त्वाच्या पाच इमारतींचा एकाच दिवशी प्रत्यक्ष वापर सुरू करण्यासाठी अंकुश पालवे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ चोंडी येथे विविध विकासकामांच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री, मंत्री व मान्यवरांच्या दौऱ्यांचे वेळोवेळी सुयोग्य नियोजन केले.

सन २०२३ मध्ये नाशिक विभागाच्या ‘नमो महास्वयंरोजगार मेळाव्या’चे उत्कृष्ट नियोजन करून राज्यात सर्वात कमी खर्चामध्ये हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात त्यांचा सहभाग राहिला. सात्रळ येथे विश्वविक्रमामध्ये नोंद झालेल्या श्री गंगागिरी महाराज सप्ताहाच्या नियोजनातही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

# गणपती बाप्पा मोरया

**भगवान गणेशाचे आद्य पूजन (प्रथमपूजा) का? काय आहे यामागील तर्कशुद्ध रहस्य. श्रीगणेशाच्या ८ अवतारांचे चरित्र, त्यांच्या कथांमागील गूढ तत्त्वज्ञान, अध्यात्मिक रहस्ये आणि विज्ञानाधिष्ठित मर्म.**



विघ्नहर्ता गणपती बाप्पाच्या अनेक कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. परंतु, पुराणातील या कथा केवळ घटना नसून त्या अतिशय उच्च पातळीवरील प्रतीकात्मक रूपके (Symbolism) आहेत. काळाच्या ओघात आपण त्यातील मूळ तत्त्व विसरून केवळ बाह्य कथेलाच सत्य मानू लागलो. गणपतीला मिळालेला ’प्रथम पूजेचा मान’ यामागे सहसा दोन प्रसिद्ध कथा सांगितल्या जातात.

शंकरांनी बाल गणेशाचे मस्तक धडावेगळे करून गजानन रूप दिल्यानंतर सर्व देवतांनी त्यांना आद्य पूजेचा अधिकार दिला. पृथ्वी प्रदक्षिणेच्या वेळी आई–वडिलांनाच प्रत्यक्ष ब्रह्मांड मानून प्रदक्षिणा घातल्याने, त्यांच्या विवेक आणि मातृ–पितृ भक्तीवर प्रसन्न होऊन त्यांना अग्रपूजेचा मान मिळाला. कथा म्हणून या दोन्ही गोष्टी आदर्श असल्या, तरी यामागील तात्त्विक आणि वैज्ञानिक मर्म अत्यंत व्यापक आहे. प्रथम पूजनामागील तर्कशुद्ध आणि आध्यात्मिक तत्त्व श्रीगणेश हे केवळ एक रूप नसून ते बुद्धी, विवेक, मूलाधार चक्र, ध्वनी आणि वैश्विक चेतनेचे अधिष्ठान आहेत.

**नादब्रह्म आणि भाषेचे मूळ उगमस्थान :** विश्वाची निर्मिती ’ॐ’कारातून म्हणजेच नादब्रह्मातून झाली. गणेश हे साक्षात प्रणव (ॐ) स्वरूप आहेत. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या वाणीच्या चारही अवस्थांचे नियमन गणेशाच्या माध्यमातून होते.

**मानवी भाषा आणि ईश्वरीय तरंगांचा सेतू :** देवतांची भाषा ही ऊर्जा आणि प्रकाशतरंगांची असते, तर मानवाची भाषा ही भौतिक ध्वनीची असते. आपल्या मानवी संकल्पांची स्पंदने विश्वातील सूक्ष्म देवतत्त्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक असणारा मुख्य ’ट्रान्सलेटर’ (मध्यस्थ दुवा) म्हणजे गणेश तत्त्व होय. त्यामुळे गणपतीच्या आवाहनाशिवाय इतर कोणत्याही देवतेशी संपर्क स्थापित होऊ शकत नाही.

**मन आणि आत्म्याचा समन्वय :**

शरीर (जड तत्त्व) आणि आत्मा (चैतन्य) यांना जोडणारा दुवा जसे ’मन’ आहे, तसेच मानवीय जाणीव आणि ईश्वरीय सत्ता यांना जोडणारी शक्ती म्हणजे ’गणेश’ आहेत. कोणत्याही कार्याची सुरुवात बुद्धीच्या योग्य दिशेने आणि स्थिर चित्ताने व्हावी लागते, म्हणूनच आद्यपूजन गणेशाचे केले जाते.



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# हे गणराया, राज्यकर्त्यांना सुबुद्धी दे!

गणेशभक्तांच्या घरी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांत गणरायाचे आगमन झाल्याने सर्वत्रचे वातावरण आनंदमय झाले असले तरी अच्छे दिन येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भारतीय जनतेला अद्याप अच्छे दिन काही पाहायला मिळालेले नाहीत. पेट्रोल–डिझेलचे भाव दिवसागणिक वाढताहेत ज्याचा परिणाम वस्तूंच्या वाहतूक खर्चावर आणि दळणवळणावर होत असल्याने अन्य वस्तूंचे दरही वाढत आहेत. यापूर्वी कधीही न अनुभवलेली महागाई सामान्य जनतेच्या वाट्याला आली आहे ज्यामूळे सामान्य नोकरदार वर्गाचे जगणे अवघड झाले आहे. महागाईचा फटका यंदाच्या गणशोत्सवालाही बसला आहे. गणरायाच्या मूर्तीपासून पूजेचे, प्रसादाचे आणि सजावटीचे साहित्य यंदा कमालीचे महागले आहे.

रुपयाची घसरण आवरणे आता राज्यकर्त्यांच्याही हाताबाहेर गेले आहे. आजमितिला समाजाची एव्हड्या मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे कि दर ४ बातम्यांच्या मागे एक बलात्काराची बातमी असते. ३ वर्षाच्या चिमुरडीपासून ८० वर्षाची वृद्धा सुद्धा नराधमांच्या वासनेपासून सुटलेली नाही. केवळ कायदे कठोर केले जात आहेत; मात्र कायद्याच्या अंमलबजावणीचे तीनतेरा वाजले आहेत. शालेय शिक्षणातून केवळ पैसे कमावण्याचे शिक्षण दिले जाते त्यामुळे नीतिमत्ता आणायची तरी कुठून ? गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराने आपले पाय घट्ट रोवले आहेत.

मोबाईल आणि इंटरनेटच्या मोहजालात आजचा तरुण स्वतःचे अस्तित्वच हरवून बसला आहे त्यामुळे समाज आणि राष्ट्राप्रती आपले काही कर्तव्य आहे याची जाणंच हरवली आहे. आत्मतेज हरवलेली माणसे नैराश्याने ग्रासून आत्महत्येचा सोपा मार्ग पत्करू लागली आहेत. पाश्च्यात्यांच्या कुसंस्कारांना बळी पडलेली तरुण पिढी जगातील सर्वात महान अशा भारतीय संस्कृतीला दूर लोटू लागली आहे. एकूणच समाजाची घडी आज पूर्णतः विसकटली आहे. तेव्हा हे गणराया, या देशाचे रहाटगाडे हाकणाऱ्या राज्यकर्त्यांना सुबुद्धी दे ! ’राजा कालस्य कारणम’ या संस्कृत सुभाषितानुसार आजच्या विस्कटलेल्या घडीला जर राज्यकर्ते जबाबदार आहेत, तर त्यांना जनतेचाही विचार प्राधान्याने करण्याची प्रेरणा दे ! दुर्जनांना दंडित करण्याची आणि सज्जनांचा सांभाळ करण्याची शक्ती दे !

– **जगन घाणेकर,** घाटकोपर, मुंबई, मो. ९६६४५५९७८०

# हिंदू संस्कृतीची परंपरा जपत आदर्शवत गणेशोत्सव साजरा करा

## आ. संग्राम जगताप यांचे आवाहन, गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना

नगर – हिंदू संस्कृतीची वैभवशाली परंपरा जपत, शास्त्रशुद्ध पद्धतीने, शिस्त व सर्व नियमांचे काटेकोर पालन करत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला त्यांनी शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेत आदर्शवत गणेशोत्सवाच्या आयोजनाबाबत विविध सूचना केल्या. उत्सवाला भक्ती, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीची जोड देत नागरिकांना त्रास होणार नाही, तसेच कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडणार नाही, हिंदूंचा हिंदूंनाच त्रास होणार याची विशेष खबरदारी प्रत्येक मंडळाने घ्यावी, असे आवाहन आ.जगताप यांनी केले.



आ.संग्राम जगताप यांनी शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेत आदर्शवत गणेशोत्सवाच्या आयोजनाबाबत विविध सूचना दिल्या.

टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात रविवारी सायंकाळी झालेल्या या बैठकीस शहरातील विविध गणेश मंडळांचे दाधिकारी, कार्यकर्ते, महिला सदस्य तसेच बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी काका ट्रस्टच्या वतीने उपस्थित गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना 'सार्वजनिक गणेशोत्सव आदर्श मार्गदर्शक पत्रकां'चे वितरण करण्यात आले.

मार्गदर्शन करताना आ. संग्राम जगताप म्हणाले, लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव हा हिंदू समाजाचे संघटन करणारा आणि स्वातंत्र्यलढ्याला बळ देणारा ऐतिहासिक उत्सव आहे. या वैभवशाली परंपरेचा वारसा आज आपण पुढे नेत आहोत. त्यामुळे संस्कृती, हिंदुत्व आणि शास्त्राची परंपरा जपत गणेशोत्सव आदर्श पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली आहे. गणेशोत्सवाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागणार नाही आणि कोणाच्याही जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी मंडळांनी दक्ष राहावे, असे आवाहन त्यांनी केले. हिंदू शास्त्रानुसार गणपतीची रोजची विधीवत पूजा व आरती करावी. ठरवून दिलेल्या वेळेतच आरती करावी. आरती मोबाईल किंवा स्पीकरवर न लावता ती सर्वांनी पाठ करूनच स्वतः म्हणावी, असेही त्यांनी सांगितले.

सर्व पदाधिकाऱ्यांनी मंडप व परिसराची स्वच्छता राखण्या बरोबरच पूजेचे साहित्य, प्रसाद व भंडारा तयार करताना स्वच्छता, दर्जा आणि आरोग्याच्या नियमांची विशेष काळजी घ्यावी. महानगरपालिका तसेच पोलिस प्रशासनाच्या आवश्यक परवानग्या घेऊनच उत्सवाचे व उपक्रमांचे आयोजन करावे, अशी सूचना त्यांनी केली. गणेशोत्सव नागरिकांसाठी आनंदाचा आणि भक्तीचा उत्सव आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीने उत्सव साजरा करणे योग्य नाही. मंडप परिसरात वाहतुकीला अडथळा होणार नाही, याची काळजी घ्या. तसेच मंडपात व परिसरात केलेल्या विद्युत रोषणाईमुळे दुर्घटना होणार नाही यासाठी सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करा, असेही आ. जगताप यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपस्थित गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. या बैठकीला नगरसेवक विकास जगताप, सागर मुर्तुडकर, अ‍ॅड. नितीन खैरे आदींसह पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. वैभव ढाकणे यांनी सूत्रसंचालन केले तर गुड्डू खताळ यांनी आभार मानले.

काका ट्रस्टच्या वतीने मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या मार्गदर्शक पत्रकात नमूद केले आहे की, आरतीचे नियोजन आणि पावित्र्य राखून वेळेचे पालन करत बाप्पाच्या सकाळ आणि संध्याकाळच्या आरती करावी. आरतीसाठी येणारे अतिथींना उशीर होत असेल तरी त्यांच्यासाठी न थांबता ठरलेल्या वेळेतच आरती करा. आरतीचे ताट (ताम्हण) सकाळ–संध्याकाळ दोन्ही वेळा स्वच्छ धुतलेले असावे. आरतीपूर्वी बाप्पाचे निर्माल्य काढून नवीन हार घालावा. तुपाच्या दिव्यानेच आरती करावी. कापूर आरती सर्वात शेवटी करावी आणि कापूर त्याच वेळी लावावा. पेन ड्राईव्ह, मोबाईल किंवा स्पीकरवर आरती न लावता, सर्वांनी एका सुरात, टाळ्या वाजवत आणि पूर्ण भक्तीभावाने एका सुरात तोंडाने म्हणावी. तसेच आरतीच्या वेळी गप्पा मारणे टाळावे.

सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसादाचे वाटप करताना स्वच्छतेची पुरेपूर काळजी घ्यावी. प्रसादाचा कुठेही अपमान होणार नाही किंवा तो पायाखाली येणार नाही, याकडे विशेष लक्ष द्यावे. उत्सवाला कोणतेही गालबोट लागू नये यासाठी परवानग्या घेणे अनिवार्य आहे. पोलीस प्रशासन, महानगरपालिका, अग्निशमन दल आणि वीज वितरण कंपनी (महावितरण) यांच्या रीतसर सर्व परवानग्या घ्या.

### सुरक्षितता आणि व्यवस्थापन

पावसाळ्याचे दिवस आणि रोषणाईचा मोठा वापर लक्षात घेता, संपूर्ण वायरिंगचे काम केवळ अनुभवी वायरमन कडूनच करून घ्यावे. स्वतः जोडणी करण्याचे धाडस करू नये. आपत्कालीन परिस्थितीसाठी मंडपात सहज दिसेल आणि वेळेवर वापरता येईल अशा ठिकाणी अग्निशामक यंत्रे बसवावीत. गर्दीचा फायदा घेणाऱ्या समाजकंटकांपासून सावधगिरी बाळगावी. कार्यकर्त्यांनी आपले कान व डोळे उघडे ठेवावेत आणि सुरक्षेसाठी मंडपाच्या आसपास सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. दर्शन बंद झाल्यानंतर रात्री मंडप, मूर्ती आणि सजावटीच्या सुरक्षेसाठी कार्यकर्त्यांची रात्रपाळी असावी, गस्तीवर असणाऱ्या कार्यकर्त्यांनी झोपू नये, सतत सतर्क राहावे.

मंडप आणि आजूबाजूच्या रस्त्याची सकाळ–संध्याकाळ स्वच्छता करावी. ओला व सुका कचरा टाकण्यासाठी स्वतंत्र कचरापेट्या ठेवाव्यात. कचरा रस्त्यावर न टाकता तो महानगरपालिकेच्या कचरागाडीतच द्यावा. परिसरातील रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्णालये यांना त्रास होऊ नये, यासाठी आवाजाची पातळी मर्यादित ठेवावी. मंडप किंवा दर्शनरांगांमुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपत्कालीन वाहनांसाठी (रुग्णवाहिका, अग्निशमन दल) रस्ता नेहमी मोकळा राहील याची काळजी घ्यावी.

# गणेशोत्सवात विचार भारतीच्या वतीने शहरात जनजागरण मोहीम

## उत्कृष्ट देखावा स्पर्धेसाठी तज्ज्ञ परिक्षकांची नियुक्ती

नगर – गणेशोत्सवानिमित्त विचार भारती, चंद्रा एजन्सी व बन्सी महाराज मिठाईवाले यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगरमध्ये उत्कृष्ट देखावा स्पर्धेच्या आयोजनाबरोबरच जनजागरण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत १८ ते २४ सप्टेंबर दरम्यान शहर व उपनगरात विविध ठिकाणी जनजागरण पथनाट्यांचे सादरीकरण होणार आहे. तसेच गणेशोत्सव सार्वजनिक व घरगुती उत्कृष्ट देखावा स्पर्धेसाठी तज्ज्ञ परिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही परिक्षण समिती नगर शहरासह भिंगार, केडगाव व सावेडी उपनगर परिसरातील ज्या गणेश मंडळांनी दिलेल्या विषयांवर देखावे सादर केले आहेत त्या देखाव्यांचे परिक्षण करून निकल जाहीर करणार आहेत, अशी माहिती गणेशोत्सव देखावा स्पर्धा प्रमुख नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी दिली.

विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे यांनी सांगितले, गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा परिक्षण समितीत ज्येष्ठ शिल्पकार प्रमोद कांबळे, सिने अभिनेते मोहिनीराज गटणे, चित्रकार अशोक डोळसे, मूर्तिकार योगेश निंबाळकर, रेडीओ जॉकी प्रसन्न पाठक, प्रसाद सुवर्णपाठकी, प्रा.अशोक सागडे, सिद्धार्थ दिक्षित, श्रेयस लहामगे आदींची नियुक्ती करण्यात आली आहे, ही समिती २० ते २४ सप्टेंबर दरम्यान शहरासह केडगाव, सावेडी व भिंगार या भागांमधील देखाव्यांचे विविध निकषांवर परिक्षण करणार असून उत्कृष्ट देखाव्यांचे नंबर काढणार आहेत. गणेशोत्सव संपल्यावर स्पर्धेचा सविस्तर निकाल जाहीर करण्यात येणार असून २ ऑक्टोबर रोजी श्री रामजन्मभूमी न्यासाचे सचिव स्वामी गोविंदगिरी महाराजांच्या हस्ते विजेत्यांना परितोषिक वितरण होणार आहे.

या स्पर्धेत घरगुती गौरी गणपती आरास स्पर्धेचेही आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी प्रमोद धाराशिवकर, आशा काळे, असावरी नातू, राधाकृष्ण जोशी व सोमनाथ खाडे आदींची परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांनी १८ सप्टेंबर पर्यंत ९३७०२९२८८३ या व्हाट्सअ‍ॅप नंबरवर घरात केलेल्या देखाव्याचे व्हिडिओ पाठवावेत. त्यातील उत्कृष्ट देखाव्यांचे परीक्षण स्पर्धेचे परीक्षक करणार करून बक्षिसे जाहीर करणार आहेत, अशी माहिती घरगुती देखावा स्पर्धेचे संपत नलावडे यांनी दिली.

जनजागरण पथनाट्य बाबत माहिती देताना समन्वयक पुष्कर तांबोळी म्हणाले, ज्यांनी युवा असताना देशासाठी सर्वस्व अर्पण करून महान कार्य केले अशा विविध संत, क्रांतिकारक व समाज सुधारकांच्या कार्यावर आधारित जनजागरण पथनाट्यांचे शहरात विविध ठिकाणी सादरीकरण होणार आहे. १८ ते २४ सप्टेंबर दरम्यात नगर शहर, सावेडी व भिंगार या भागांमध्ये कलाकार पथनाट्य सादर करून जनजागरण करणार आहेत.

# अहिल्यानगरचे अभियंता आसिम गफ्फार शेख यांची रोटरी क्लब ऑफ पुणे एअरविंग्सच्या सचिवपदी निवड



नगर – अहिल्यानगरचे भूमिपुत्र अभियंता आसिम गफ्फार शेख यांची रोटरी क्लब ऑफ पुणे एअरविंग्सच्या सचिवपदी निवड करण्यात आली आहे.

आसिम शेख हे सत्कार फाउंडेशनचे संस्थापक असून, सत्कार फाउंडेशन हे अहिल्यानगर जिल्ह्यातील ऑनलाइन परीक्षा केंद्र म्हणून कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक परीक्षा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने फाउंडेशनच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. ते राष्ट्रीय युवा पुरस्कारप्राप्त आणि महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. गफ्फार शेख यांचे पुत्र आहेत. तसेच, आसिम शेख हे सत्कार असोसिएट या बांधकाम क्षेत्रातील आघाडीच्या व्यवसायसंस्थाचे सुद्धा संस्थापक असून, व्यावसायिक क्षेत्रासोबतच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही ते सक्रियपणे कार्यरत आहेत.

अहिल्यानगरच्या भूमीतून आपल्या कार्याची सुरुवात करून पुण्यातही त्यांनी सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांचा, कार्याचा आणि सेवाभावी दृष्टिकोनाचा विचार करून रोटरी क्लबने त्यांच्यावर सचिवपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.

# हस्तीमल मुनोत यांना 'जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान'



नगर – श्रमण संघीय चतुर्थ पट्टधर आचार्य सम्राट पूज्य डॉ. शिवमुनीजी म.सा. यांचा ८५ वा जन्मोत्सव आणि श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्लीचा वार्षिकोत्सव राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन यांच्या नेतृत्वाखाली १८ सप्टेंबर रोजी बलेश्वर सुरत (गुजरात) येथे होणार आहे. यावेळी अहिल्यानगर येथील जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांना 'जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान २०२६' ने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय आयोजन समितीचे मुख्य संयोजक जसवंत जैन यांनी दिली.

जैन कॉन्फरन्सच्या वार्षिकोत्सवात संघटनात्मक बैठक, सन्मान सोहळा आणि भव्य भक्ती संध्या असे कार्यक्रम होणार आहेत. हस्तीमल मुनोत यांचा समाजकार्यातील प्रदीर्घ योगदानाबद्दल राष्ट्रीय सन्मान करण्यात येणार आहे. त्यांना केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'सहकारयात्री' उपाधीने गौरविण्यात आले आहे. मुनोत हे अहिल्यानगर श्वेतांबर स्थानकवासी जैन संघाचे ३४ वर्षांपासून अध्यक्ष असून श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे ३५ वर्षांपासून अध्यक्ष आहेत. आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्यावर नितांत श्रद्धा असल्याने ते मानव सेवा हीच ईश्वर सेवा मानून समाजासाठी भरीव योगदान देत असतात. धार्मिक परीक्षा बोर्डचे ते उपाध्यक्ष आहेत. आचार्यश्रींच्या देशभरातून येणाऱ्या भक्तांसाठी भक्त निवास, परमार्थिक दवाखाना, आनंदधाम येथे आचार्य भगवंतांचा स्मृती कक्ष अशा अनेक कार्यात ते सातत्याने योगदान देत आहेत.

विहारासाठी आलेल्या साधूसाध्वींची सेवा करणे, त्यांच्या सान्निध्याचा, मार्गदर्शनाचा लाभ अधिकाधिक भाविकांना मिळवून देणे यासाठी ते विशेष प्रयत्न करतात. धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदधाम येथे होणाऱ्या धार्मिक सोहळ्यावेळच्या नियोजनात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. विद्यमान आचार्य डॉ. शिवमुनीजी म.सा. यांच्या संस्थेचे ते मार्गदर्शक सल्लागार आहेत. चांदमल मुनोत ट्रस्टचे ते अध्यक्ष असून या ट्रस्टच्या माध्यमातून मागील २५ वर्षांपासून अहिल्या नगर व पुणे येथे मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात येते. हजारो गरजूंनी या शिबिराचा लाभ घेतला आहे.

पांजरापोळ गोरक्षण संस्थेच्या माध्यमातून ते गेली ४५ वर्षे गोरक्षण व गोसेवेचे भरीव कार्य करत आहेत. जिल्हा कुष्ठरोग समिती, राष्ट्रभाषा शिक्षा मंडळ अशा अनेक संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. वृध्दाश्रमाचे ते विश्वस्त होते. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य गोशाळा व पांजरपोळ संघाचे उपाध्यक्ष, आडतेबाजार मर्चंटस् असोसिएशनचे ते दहा वर्षे अध्यक्ष होते. पुणे येथील आनंद प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे उपाध्यक्षपदही ते भूषवत आहेत. नगर जिल्ह्यासह राज्यात नावाजल्या जाणाऱ्या अहमदनगर मर्चंटस् बँकेचे संस्थापक चेअरमन असून गेली ५४ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे ते मुख्य आधारस्तंभ आहेत. आज सहकारी बँकिंग क्षेत्रात सलग ५९ वर्षे ते योगदान देत आहेत जे सबंध भारतातील एकमेव उदाहरण असू शकते. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रात आज वयाच्या ९३ व्या वर्षीही ते तितक्याच उत्साहाने योगदान देत आहेत. राष्ट्रीय स्तरावरील गोपालरत्न पुरस्कार, आदर्श व्यापारी पुरस्कार, समाजरत्न, जितो जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. आता जैन कॉन्फरन्सचा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान त्यांना प्राप्त होत आहे. अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व असलेल्या मुनोत यांच्या सन्मानाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# अहिल्यानगरमध्ये तायक्वांदो पंच परीक्षा उत्साहात

## आंतरराष्ट्रीय पंच गौरव सिंह यांचे तंत्रशुद्ध खेळ व नियमावलीबाबत केले मार्गदर्शन

नगर – इंडिया तायक्वांदोच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनच्या अंतर्गत तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन, अहिल्यानगर व एकलव्य तायक्वांदो अ‍ॅकॅडमी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंच परीक्षा उत्साहात पार पडली. झेंडा चौक, भूषणनगर, केडगाव येथील आर.एम.टी. बिझनेस सेंटरमध्ये नुकतीच ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी परीक्षक म्हणून उत्तराखंडचे आंतरराष्ट्रीय पंच गौरव सिंह उपस्थित होते. त्यांनी सहभागी पंचांना तायक्वांदो खेळातील विविध तंत्रे, सामन्यांचे नियम, पंचांची भूमिका, निर्णयप्रक्रिया तसेच तंत्रशुद्ध पद्धतीने खेळाचे संचालन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियम व पंचगिरीतील बारकावे समजून घेण्यासाठी ही परीक्षा व मार्गदर्शन कार्यशाळा उपयुक्त ठरली.



अहिल्यानगरमध्ये तायक्वांदो पंच परीक्षा उत्साहात झाल्या.

यावेळी महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे उपाध्यक्ष घनश्याम सानप, क्रीडा राज्य मार्गदर्शक संतोष वाबळे आणि ज्येष्ठ मार्गदर्शक अल्ताफ खान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत पंच परीक्षेतील सहभागींचा उत्साह वाढला. या पंच परीक्षेत गणेश वंजारे, योगेश बिचितकर, युवराज लोखंडे, मंगेश आहेर, तेजअंकित बोंगाडे, वैष्णवी पाटोळे, ओमकार पवार, पियुष सहानी, अमित लोंढे, सचिन कोतकर, चंद्रकांत बिरारे, असता तोमर आणि सबा खान यांनी सहभाग नोंदविला.

तायक्वांदो हा शिस्त, अचूकता आणि नियमबद्धतेवर आधारित खेळ असून, पंचांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे पंचांना अद्ययावत नियमांची माहिती असणे तसेच सामन्यादरम्यान योग्य व निष्पक्ष निर्णय घेण्याचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे यावेळी गौरव सिंह यांनी सांगितले.

तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफ्फार पठाण, कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, अहिल्यानगर शहर तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, उपाध्यक्ष संतोष लांडे तसेच आर.एम.टी. बिझनेस सेंटरचे चेअरमन मनीष ठुबे यांनी पंच परीक्षा व मार्गदर्शन कार्यशाळेत सहभागी झालेल्या पंचांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सामाजिक बांधिलकी जपणारे : संतोष गांधी

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेल्या अहिल्यानगरच्या मातीत समाजासाठी तळमळीने काम करण्याचा गुण आहे. आचार्यश्रींच्या मानव सेवेच्या शिकवणीनुसार अनेक जण शहरात सामाजिक, धार्मिक क्षेत्रात निरपेक्ष योगदान देत आहेत. यापैकीच एक अग्रेसर व्यक्तीमत्व म्हणून संतोष फुलचंद गांधी यांची ओळख आहे. शहरातील गांधी कुरियरचे संचालक असलेले गांधी हे गेल्या दशकभरापासून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत योगदान देत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त (१४ सप्टेंबर २०२६) विशेष लेख...



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन वास्तव्याने पावन झालेल्या नगरमध्ये त्यांच्या आशीर्वादाने आणि प्रेरणेतून अनेक सेवाभावी व्यक्तीमत्व उभी राहिली आहेत. स्वतःच्या व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळून समाजासाठी कायम तत्परतेने काम करणारे संतोष गांधी हे आचार्यश्रींचे निस्सीम भक्त आहेत. त्यांचा स्वतःचा मोठा कुरियर व्यवसाय आहे. हा व्यवसाय करताना त्यांनी समाजासाठी नेहमीच भरीव योगदान दिले आहे. सामाजिक, धार्मिक, अर्थकारण, राजकारण अशा विविध क्षेत्रात गांधी सक्रीय आहेत. जैन ओसवाल पंचायत सभा, जैन वात्सल्य संस्था, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक, सहकारी ग्राहक भांडार, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशा विविध संस्था, संघटनात ते कार्यरत आहेत.

जैन समाजाची शिखर संस्था असलेल्या जैन ओसवाल पंचायत सभेच्या माध्यमातून समाजातील गरजूंना आवश्यक ती मदत करून त्यांना सन्मानाने उभे करण्यात संतोष गांधी अग्रेसर असतात. या संस्थेद्वारे समाजाला संघटित करतानाच समाजात आपापसातील एकोपा वृद्धिंगत व्हावा, गरजूंना प्रगतीसाठी आवश्यक ती मदत करणे अशी विविध भरीव कामे केली जातात. जैन वात्सल्य संस्थेच्या माध्यमातूनही दर महिन्याला गरजू कुटुंबाना अन्नधान्य, किराणा दिला जातो. तसेच गरजू रुग्णांना वैद्यकीय सहाय्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत असे उपक्रम राबविण्यात येतात.

संतोष गांधी सहकार क्षेत्रातही भरीव योगदान देत आहेत. सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमनपद भूषविताना संस्थेने १०० कोटींच्या ठेवींचा पल्ला गाठला. संस्थेची जुनी वसूली प्रभावीपणे करून संस्थेच्या अर्थकारणाला बळकटी दिली तसेच विविध योजनांच्या माध्यमातून पतसंस्थेच्या व्यवसाय वृध्दीत योगदान दिले आहे. सभासदांना केंद्रस्थानी ठेवून उत्कृष्ट आर्थिक काम काजाची परंपरा गांधी यांनी कायम राखली. संचालक म्हणूनही संस्थेच्या प्रगतीत ते सातत्याने योगदान देत आहेत.

जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असा नावलौकिक असलेल्या भारतीय जनता पक्षाचे सक्रिय पदाधिकारी म्हणून संतोष गांधी शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने योगदान दिले पाहिजे असे त्यांचे ठाम मत असते. धार्मिक कार्यातही गांधी यांचा हिरीरीने सहभाग असतो. आनंदधाम, धार्मिक परीक्षा बोर्ड येथील विविध धार्मिक कार्यक्रमात ते सक्रिय सहभाग नोंदवतात. साधूसाध्वीजींची सेवा करण्यात ते रममाण होतात.

दिनदुबळ्यांची सेवा व गरजूंना मदत ही संतांची शिकवण ते कायम आचरणात आणतात. समाजासाठी चांगले काही तरी करण्याची आवड असल्याने स्वत:च्या कुरिअर व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळून ते सामाजिक कार्यासाठी नियमित वेळ काढतात. त्यांच्या याच कार्यामुळे अहिल्या नगर येथील जैन ओसवाल युवक संघातर्फे (जॉईज) त्यांचा जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने नुकताच सन्मान करण्यात आला. निरपेक्ष भावनेने समाजकार्य कसे करायचे आणि यातून शेवटच्या घटकाची उन्नती साधायची याचा आदर्श वस्तुपाठ गांधी यांनी घालून दिला आहे. त्यांना वाढदिवसानिमित्त उदंड आणि निरोगी दीर्घायुष्य लाभावे याच शुभेच्छा!

**– नितीन मुनोत (बाळू),** नगर

# विश्वविक्रमवीर डॉ. दीपक हरके यांनी घेतली खा. उदयनराजे भोसले यांची सदिच्छा भेट

सातारा – छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट १३ वे वंशज आणि सातारा गादीचे वारसदार, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांची १८४ विश्वविक्रमांची नोंद करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके यांनी सातारा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी डॉ. हरके यांनी विविध क्षेत्रांत केलेल्या विश्वविक्रमांची तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती उदयनराजे भोसले यांना दिली. भारताचे नाव जागतिक स्तरावर अधोरेखित करण्यासाठी विविध क्षेत्रांत कार्य करण्याचा त्यांचा प्रवास यावेळी चर्चेत आला.



डॉ. दीपक हरके यांची खा. उदयनराजे भोसले यांची सदिच्छा भेट घेतली.

समाजोपयोगी उपक्रम, युवकांमध्ये सकारात्मक विचारांची रुजवण आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून प्रेरणादायी कार्य करण्याबाबतही यावेळी विचारविनिमय झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि विचारांचा वारसा लाभलेल्या सातारा गादीच्या वारसदारांची डॉ. हरके यांनी घेतलेली ही सदिच्छा भेट विशेष ठरली.

विश्वविक्रमांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर पोहोचविण्याच्या प्रयत्नांना या भेटीमुळे नवी प्रेरणा मिळाल्याचे मानले जात आहे. यावेळी सातारा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नगरसेवक धनंजय पाटील उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या आर्थिक व्यवहारांना पूर्णविराम मिळत असला, तरी प्राप्तिकराच्या दृष्टीने सर्व जबाबदाऱ्या तत्काळ संपत नाहीत. मृत व्यक्तीने हयात असताना मिळविलेल्या उत्पन्नाचे विवरणपत्र भरायचे राहिले असेल, कराची थकबाकी असेल किंवा प्राप्तिकर विभागाकडील एखादी कार्यवाही प्रलंबित असेल, तर ती जबाबदारी कायदेशीर प्रतिनिधी अथवा वारसाला पूर्ण करावी लागू शकते. मात्र अशा कराची वसुली सर्वसाधारणपणे मृत व्यक्तीकडून वारशाने मिळालेल्या मालमत्तेच्या मर्यादेतच केली जाते.

## मृत्यूनंतरही न संपणारी करजबाबदारी

■ अर्थ विशेष




मृत व्यक्तीने आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून मृत्यूच्या तारखेपर्यंत मिळविलेल्या उत्पन्नाचे प्राप्तिकर विवरणपत्र कायदेशीर प्रतिनिधीने दाखल करणे आवश्यक असते. यापूर्वीच्या आर्थिक वर्षाचे विवरणपत्रही भरायचे राहिले असल्यास त्याची जबाबदारीदेखील कायदेशीर प्रतिनिधीकडे येऊ शकते. मात्र मृत्यूनंतर निर्माण झालेले उत्पन्न मृत व्यक्तीच्या विवरणपत्रात दाखविले जात नाही. त्यामुळे उत्पन्न कोणत्या कालावधीत मिळाले, हे निश्चित करणे महत्त्वाचे ठरते.

■ कायदेशीर वारस म्हणून नोंदणी

मृत व्यक्तीचे विवरणपत्र दाखल करण्यासाठी संबंधित व्यक्तीने प्राप्तिकर विभागाच्या ई-फायलिंग पोर्टलवर कायदेशीर वारस अथवा प्रतिनिधी म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी मृत्यू प्रमाणपत्र, मृत व्यक्तीचा तसेच प्रतिनिधीचा पॅन आणि कायदेशीर वारस असल्याचा पुरावा सादर करावा लागतो. मृत्युपत्र, वारस प्रमाणपत्र किंवा नियमानुसार स्वीकारला जाणारा प्रतिज्ञापत्राचा नमुना यासाठी उपयोगी ठरू शकतो. नोंदणीला मान्यता मिळाल्यानंतर प्रतिनिधी मृत व्यक्तीच्या वतीने विवरणपत्र दाखल करून त्याची इलेक्ट्रॉनिक पडताळणी करू शकतो.

विवरणपत्र तयार करताना फॉर्म २६एएस, वार्षिक माहिती विवरणपत्र म्हणजेच एआयएस, टीआयएस, बँक खात्यांचे तपशील, व्याजाचे उत्पन्न आणि भांडवली नफ्याची माहिती काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे. मृत्यू विवरणपत्र दाखल करण्याच्या अंतिम मुदतीच्या अगदी जवळ झाला असेल आणि वेळेत विवरणपत्र दाखल करणे शक्य नसेल, तर विलंबाचे रास्त कारण स्पष्ट करून उपलब्ध कायदेशीर पर्यायांचा उपयोग करता येतो.

■ प्राप्तिकराच्या नोटिशीचे काय?

मृत व्यक्तीच्या नावाने मृत्यूनंतर नव्याने काढण्यात आलेल्या नोटिशीच्या वैधतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशी नोटीस मिळाल्यास तिचे स्वरूप, ती कधी जारी झाली, कोणाच्या नावाने आहे आणि संबंधित कार्यवाही मृत्यूपूर्वी सुरू झाली होती का, हे तपासणे आवश्यक आहे. मृत व्यक्तीच्या हयातीत सुरू झालेली वैध करनिर्धारण किंवा अन्य कार्यवाही कायदेशीर प्रतिनिधीविरुद्ध पुढे चालू राहू शकते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे करप्रकरणांचा अंतिम निपटारा होण्यापूर्वी वारशाने मिळालेली मालमत्ता घाईने वाटून देणे, हस्तांतरित करणे, विकणे किंवा गहाण ठेवणे टाळावे. थकीत कराची देणी असताना प्रतिनिधीने मालमत्तेची विल्हेवाट लावल्यास काही परिस्थितीत त्याच्यावर वैयक्तिक जबाबदारी येऊ शकते; तीदेखील चुकीच्या पद्धतीने हाताळलेल्या वारसा-मालमत्तेच्या मूल्याच्या मर्यादेत असते. म्हणून मृत्यूनंतर प्राप्तिकराशी संबंधित नोंदणी तातडीने करणे, प्रलंबित विवरणपत्रे आणि नोटिसा तपासणे आणि सर्व वैध करदेणी निकाली निघेपर्यंत वारसा-मालमत्ता सुरक्षित ठेवणे, ही कायदेशीर वारसासाठी सर्वांत महत्त्वाची कृतीसूची ठरते.

■ माहीत आहे?



## 'झिरो कॉस्ट ईएमआय'चे अर्थगणित


महागडा स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा टीव्ही खरेदी करताना 'झिरो कॉस्ट ईएमआय'चा पर्याय आकर्षक वाटतो. व्याज न देता वस्तू हप्त्यांमध्ये मिळत असेल, तर एकरकमी पैसे कशाला द्यायचे, असा विचार साहजिकच मनात येतो. मात्र 'झिरो कॉस्ट' म्हणजे ग्राहकाला कोणताही अतिरिक्त खर्च होणार नाही, असे प्रत्येक वेळी नसते. प्रक्रिया शुल्क, कर आणि रोखीच्या खरेदीवर मिळणारी सवलत गमावल्यामुळे प्रत्यक्ष खर्च वाढू शकतो.

एखाद्या मोबाईलची किंमत ६०,००० रुपये आहे. त्यावर ६ महिन्यांची झिरो कॉस्ट ईएमआय योजना घेतली आणि बँकेने या कालावधीसाठी २,४०० रुपये व्याज निश्चित केले. अशा योजनेत विक्रेता मोबाईलच्या किमतीत २,४०० रुपयांची सवलत देऊ शकतो. त्यानंतर बँक हप्त्यांमध्ये २,४०० रुपयांचे व्याज आकारते. त्यामुळे ग्राहकाचा मूळ खर्च पुन्हा साधारण ६०,००० रुपयांपर्यंत येतो. अनेक झिरो कॉस्ट ईएमआय योजनांमागील गणित साधारण असेच असते. पण खरी किंमत ठरवताना इतर शुल्कांकडेही लक्ष द्यावे लागते. उदाहरणार्थ, बँकेने ईएमआयमध्ये व्यवहार रूपांतरित करण्यासाठी २९९ रुपये प्रक्रिया शुल्क आकारले, तर तुमचा खर्च ६०,००० रुपयांच्या पुढे जातो. या शुल्कावर लागू होणारा जीएसटीही वेगळा असू शकतो.

व्याजाच्या रकमेवरील जीएसटीचाही विचार महत्त्वाचा आहे. विक्रेत्याकडून मिळालेली सवलत व्याजाची भरपाई करत असली, तरी बँकेकडून व्याजावर आकारला जाणारा कर त्या सवलतीत समाविष्ट असेलच असे नाही. त्यामुळे क्रेडिट कार्डच्या मासिक विवरणपत्रात ईएमआयबरोबर व्याज आणि त्यावरील जीएसटी स्वतंत्रपणे दिसू शकतो.

आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गमावलेली सवलत. ६०,००० रुपयांचा मोबाइल एकरकमी क्रेडिट कार्डने खरेदी केल्यास ४,००० रुपयांची तत्काळ सवलत मिळत असेल, तर त्याची प्रभावी किंमत ५६,००० रुपये होते. मात्र झिरो कॉस्ट ईएमआय मूळ ६०,००० रुपयांवरच उपलब्ध असेल आणि त्यावर ही सवलत मिळत नसेल, तर ईएमआय निवडल्यामुळे प्रत्यक्षात ४,००० रुपये अधिक मोजावे लागतात.

झिरो कॉस्ट ईएमआय वाईट पर्याय आहे असे नाही. एकाच वेळी मोठी रक्कम खर्च न करता मासिक अर्थसंकल्प सांभाळण्यासाठी तो उपयोगी ठरू शकतो. मात्र निर्णय घेण्यापूर्वी एकरकमी खरेदीची अंतिम किंमत, सर्व ईएमआयची एकूण रक्कम, प्रक्रिया शुल्क व कर आणि ईएमआयमुळे गमावली जाणारी सवलत या ४ आकड्यांची तुलना करा. थोडक्यात, 'महिन्याला किती?' यापेक्षा 'अखेरीस एकूण किती?' हा प्रश्न विचारला, तरच झिरो कॉस्ट ईएमआयचा खरा फायदा समजेल.




## फायद्यापेक्षा मर्यादाच अधिक

गुंतवणुकीत भांडवलाची सुरक्षितता आणि नियमित उत्पन्न या दोन्ही गोष्टींना प्राधान्य देणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी भारत सरकारचे 'फ्लोटिंग रेट सेव्हिंग्ज बाँड' हा विचार करण्याजोगा पर्याय आहे. या बाँडची मुदत ७ वर्षांची असून किमान १,००० रुपयांपासून गुंतवणूक करता येते. गुंतवणुकीच्या कमाल रकमेवर मर्यादा नाही. मात्र दीर्घ मुदतीसाठी पैसे गुंतवण्यापूर्वी या बाँडची रचना, व्याज आणि पैसे काढण्यासंबंधीच्या अटी समजून घेणे आवश्यक आहे.

या बाँडचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा व्याजदर कायमस्वरूपी निश्चित नसतो. तो राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या म्हणजेच एनएससीच्या प्रचलित व्याजदराशी जोडलेला असतो. एनएससीच्या दरापेक्षा ०.३५ टक्के अधिक दर या बाँडसाठी निश्चित केला जातो. व्याजदर दर ६ महिन्यांनी फेरनिश्चित होतो. त्यामुळे भविष्यात एनएससीचा दर बदलल्यास बाँडवरील परतावाही त्यानुसार बदलू शकतो. व्याजाचे पैसे दर ६ महिन्यांनी गुंतवणूकदाराला मिळतात. या बाँडची मुदत ७ वर्षांची असल्याने अल्पावधीत लागणारे पैसे यात गुंतवणे योग्य ठरणार नाही. बाँड दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर हस्तांतरित करता येत नाही आणि त्याच्या तारणावर कर्जही घेता येत नाही. त्यामुळे आपत्कालीन निधी स्वतंत्र ठेवूनच अशा गुंतवणुकीचा विचार करावा.

**ऑफलाईन खरेदी करताना अडचण का येते? :** फ्लोटिंग रेट सेव्हिंग्ज बाँड प्रत्येक बँकेच्या प्रत्येक शाखेत उपलब्ध असेलच असे नाही. स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, यूको बँक यांसारख्या सरकारी बँकांसह एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, आयडीबीआय बँक आदी अधिकृत संस्थांच्या निर्धारित शाखांमधून अर्ज करता येतो. स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या अधिकृत कार्यालयांमधूनही सुविधा उपलब्ध असू शकते. त्यामुळे एखाद्या शाखेने अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्यास संबंधित बँकेची बाँड अर्ज स्वीकारणारी निर्धारित शाखा कोणती, याची माहिती घ्यावी. विशेष म्हणजे ज्या बँकेतून बाँड खरेदी करायचा आहे, त्याच बँकेत बचत खाते असणे बंधनकारक नाही. अर्जासोबत पॅन, आधार किंवा अन्य ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा आणि व्याज जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील द्यावा लागतो. गुंतवणुकीची रक्कम चेक, डिमांड ड्राफ्ट, पे ऑर्डर तसेच आरटीजीएस किंवा एनईएफटीद्वारे भरता येते. रोख रक्कम स्वीकारण्यावर मात्र मर्यादा आहेत. सुरक्षितता आणि नियमित व्याज ही या बाँडची जमेची बाजू असली, तरी व्याज पूर्णपणे करमुक्त नसणे आणि गुंतवणुकीची मर्यादित तरलता लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. म्हणून केवळ व्याजदर पाहण्याऐवजी करानंतरचा प्रत्यक्ष परतावा आणि ७ वर्षांसाठी पैशांची गरज यांचा विचार करूनच गुंतवणूक करावी.

## गुंतवणुकीवर वजावटीचा लाभ; पण...



करबचत करतानाच शेअर बाजारातील गुंतवणुकीतून दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची संधी हवी असेल, तर इक्विटी लिंक्ड सेव्हिंग्ज स्कीम अर्थात 'ईएलएसएस' हा एक पर्याय आहे. ईएलएसएस ही करसवलत मिळणारी म्युच्युअल फंड योजना असून, जुन्या करप्रणालीची निवड करणाऱ्या करदात्यांना प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८०सी अंतर्गत तिचा लाभ घेता येतो. एका आर्थिक वर्षात ईएलएसएसमध्ये केलेल्या दीड लाखांपर्यंतच्या पात्र गुंतवणुकीवर वजावटीचा दावा करता येतो.

ईएलएसएसचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचा तुलनेने कमी लॉक-इन कालावधी. कलम ८०सी अंतर्गत येणाऱ्या लोकप्रिय गुंतवणूक पर्यायांपैकी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी अर्थात पीपीएफमध्ये १५ वर्षांचा कालावधी असतो, तर करबचत मुदत ठेवीचा लॉक-इन ५ वर्षांचा असतो. ईएलएसएसमध्ये मात्र गुंतवणुकीची रक्कम ३ वर्षांसाठी लॉक होते. लॉक-इन संपल्यानंतर युनिट्स विकताना एक्झिट लोड लागत नसल्याचे या माहितीत नमूद करण्यात आले आहे.

■ एकरकमी किंवा एसआयपीने गुंतवणूक

ईएलएसएसमध्ये एकरकमी रक्कम गुंतविता येते किंवा एसआयपीच्या माध्यमातून ठरावीक अंतराने नियमित गुंतवणूक करता येते. मात्र एसआयपी करताना एक बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक हप्त्यातून खरेदी केलेल्या युनिट्सचा ३ वर्षांचा लॉक-इन स्वतंत्रपणे मोजला जातो. त्यामुळे एसआयपी सुरू केल्यापासून ३ वर्षांनी सर्व गुंतवणूक एकाच वेळी मोकळी होते, असा अर्थ घेणे योग्य नाही. ईएलएसएस ही प्रामुख्याने इक्विटीमध्ये गुंतवणूक करणारी योजना असल्यामुळे तिच्यातील परतावा निश्चित किंवा हमीचा नसतो. शेअर बाजारातील चढ-उतारांनुसार गुंतवणुकीचे मूल्य कमी-जास्त होऊ शकते. त्यामुळे केवळ ३ वर्षांचा लॉक-इन आहे म्हणून ३ वर्षांच्या गुंतवणुकीच्या दृष्टीनेच या योजनेकडे पाहण्याऐवजी दीर्घकालीन उद्दिष्टांचा विचार करणे आवश्यक ठरते.

■ कररचना

करसवलत मिळते; पण ईएलएसएसमधील गुंतवणुकीवर कलम ८०सीची वजावट मिळणे आणि युनिट्स विकल्यानंतर मिळणाऱ्या नफ्यावर लागू होणारा भांडवली नफा कर या दोन स्वतंत्र बाबी आहेत. त्यामुळे गुंतवणुकीच्या वेळी करसवलत मिळाली म्हणजे भविष्यात मिळणारा संपूर्ण नफा करमुक्त असेल, असे समजू नये. त्याचप्रमाणे कलम ८०सीचा फायदा जुन्या करप्रणालीतच उपलब्ध असल्याने नवीन करप्रणाली स्वीकारलेल्या करदात्याने केवळ करबचतीसाठी ईएलएसएसमध्ये पैसे गुंतवण्यापूर्वी ही बाब तपासावी. अर्थात करसवलत मिळत नसली तरी ईएलएसएसमध्ये गुंतवणूक करण्यास प्रतिबंध नसतो; मात्र त्यामागील उद्देश मग करबचतीऐवजी दीर्घकालीन इक्विटी गुंतवणूक हा राहतो.

ईएलएसएसचे आकर्षण त्यामुळे दुहेरी आहेहजुन्या करप्रणालीतील पात्र करदात्याला कलम ८०सीची वजावट आणि त्याचबरोबर इक्विटी बाजारातून दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची संधी. मात्र परतावा बाजाराशी निगडित असल्यामुळे केवळ कर वाचतो किंवा मागील काही वर्षांत एखाद्या योजनेने चांगला परतावा दिला आहे, एवढ्याच आधारावर गुंतवणुकीचा निर्णय घेणे योग्य ठरणार नाही.

## लग्नातील दागिन्यांच्या विक्रीवर करआकारणी

लग्नसमारंभात आई-वडील किंवा नातेवाईकांकडून मिळणारे सोने-चांदीचे दागिने भावनिकदृष्ट्या महत्त्वाचे असतात. ते कठीण काळात आर्थिक आधार म्हणूनही मोलाची भूमिका बजावतात. अनेकदा लोकांचा असा समज असतो की लग्नात मिळालेली भेटवस्तू करमुक्त असते, त्यामुळे ती विकताना मिळणारा संपूर्ण पैसाही कराच्या कक्षेतून बाहेर असेल. परंतु, ही धारणा पूर्णपणे चुकीची असून, दागिने विकताना कराचा नेमका गणित कसा असतो हे समजून घेणे गरजेचे आहे.



सध्याच्या आयकर कायद्यानुसार, लग्नाच्या प्रसंगी मिळणाऱ्या कोणत्याही भेटवस्तूवर, मग ते दागिने असोत, रोकड असो किंवा इतर कोणतीही संपत्ती असो, प्राप्तकर्त्याला कोणताही कर भरावा लागत नाही. ही सूट पूर्णपणे अमर्यादित आहे. म्हणजेच, भेटवस्तूचे मूल्य कितीही असो आणि ती कोणाकडूनही मिळालेली असो, त्यावर एक रुपयाही कर आकारला जात नाही. परंतु, ज्या दिवशी तुम्ही ते दागिने बाजारात विकून रोख रक्कम मिळवता, तेव्हा त्या विक्रीतून होणाऱ्या नफ्यावर प्राप्तकराची देयता निर्माण होते. त्यामुळे विक्रीतून मिळालेला सर्वच्या सर्व पैसा करमुक्त नसतो आणि संपूर्ण रकमेवर करही आकारला जात नाही. कर केवळ तुमच्या नफ्यावरच लावला जातो.

विक्रीवर किती कर लागेल, हे दागिने तुमच्या आणि तुमचे आई-वडील यांच्याकडे मिळून एकूण किती काळ राहिले आहेत, यावर अवलंबून असते.


वडिलांनी दागिने खरेदी केल्याच्या तारखेपासून तुम्ही ते विकण्याच्या तारखेपर्यंतचा एकूण काळ २४ महिन्यांपेक्षा कमी असेल, तर होणारा नफा तुमच्या नियमित उत्पन्नात जोडला जातो आणि तुमच्या कर स्लॅबनुसार कर आकारला जातो.

संयुक्त कालावधी चोवीस महिन्यांपेक्षा जास्त असेल, तर तो लाँग टर्म कॅपिटल गेन टॅक्स मानला जातो आणि होणाऱ्या नफ्यावर १२.५ टक्के दराने कर लावला जातो.

■ खरेदीची किंमत कशी ठरवली जाते?

कराचा हिशोब करण्यासाठी सर्वात मोठा प्रश्न हा पडतो की दागिन्याची खरेदी किंमत काय मानली जाईल, कारण तुम्हाला तर ते भेट म्हणून मिळाले होते. कर नियमांनुसार, तो दागिने खरेदी करण्यासाठी तुमच्या वडिलांनी किंवा जुन्या मालकाने जेवढी किंमत मोजली होती, तीच तुमची खरेदी किंमत मानली जाते.

एक एप्रिल २००१ पूर्वीचे दागिने असल्यास, त्या तारखेचे बाजारमूल्य आपली खरेदी किंमत मानण्याचा पर्याय उपलब्ध असतो. यासाठी कोणत्याही नोंदणीकृत मूल्यमापकाकडून अधिकृत प्रमाणपत्र बनवून घेणे आवश्यक असते.




## आयटीआरमध्ये 'टीसीएस'चा दावा राहिला?

प्राप्तिकर विवरणपत्र म्हणजेच 'आयटीआर' भरल्यानंतर परदेश प्रवास, नवी मोटार खरेदी किंवा परदेशात पैसे पाठविताना कापण्यात आलेल्या 'टीसीएस'चा दावा करायचा राहून गेल्याचे अनेक करदात्यांच्या नंतर लक्षात येते. मात्र त्यामुळे ही रक्कम बुडाली, असे समजण्याचे कारण नाही. प्राप्तिकर कायद्यात राहून गेलेल्या टीसीएस क्रेडिटचा दावा करण्याची तरतूद आहे. त्यासाठी मात्र निर्धारित मुदत आणि योग्य प्रक्रिया समजून घेणे महत्त्वाचे आहे. मूळ आयटीआर भरताना टीसीएस क्रेडिटचा दावा राहिला असेल, तर प्राप्तिकर कायद्याच्या कलम १३९(५) अंतर्गत सुधारित विवरणपत्र म्हणजेच 'रिवाइज्ड रिटर्न' भरता येते. त्यासाठीची निर्धारित मुदत शिल्लक असणे आवश्यक आहे. सुधारित विवरणपत्रात राहिलेली टीसीएसची रक्कम समाविष्ट केल्याने मिळणारा परतावा वाढू शकतो किंवा देय कराची रक्कम कमी होऊ शकते. मात्र सुधारित विवरणपत्र भरण्यापूर्वी फॉर्म २६एएस, ॲन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट (एआयएस) आणि टीसीएस कापणाऱ्या संस्थेने दिलेला फॉर्म २७डी यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. टीसीएसची रक्कम २६एएस किंवा एआयएसमध्येच दिसत नसेल, तर केवळ आयटीआरमध्ये ती दाखवून क्रेडिट मिळणार नाही. अशा वेळी टीसीएस गोळा करणाऱ्या संस्थेशी संपर्क साधून फॉर्म २७ईक्यूद्वारे दुरुस्ती विवरण सादर करण्यास सांगावे लागेल. याउलट २६एएसमध्ये टीसीएस योग्य प्रकारे दिसत असेल आणि केवळ आयटीआरमध्ये त्याचा दावा करणे राहिले असेल, तर सुधारित विवरणपत्रातील टीसीएसच्या संबंधित रकान्यात तो समाविष्ट करता येतो.

आयटीआरवर प्रक्रिया पूर्ण झाली आणि कलम १४३(१) अंतर्गत सूचना आली असली तरी सुधारित विवरणपत्राची मुदत संपलेली नसेल, तर रिटर्नमध्ये सुधारणा करता येते. मात्र मूळ आयटीआरमध्ये टीसीएसचा दावाच केला नसेल, तर कलम १५४ अंतर्गत 'रेक्टिफिकेशन'च्या माध्यमातून नवा दावा जोडणे शक्य नसते. ही सुविधा आधी केलेल्या दाव्यातील विशिष्ट चूक दुरुस्त करण्यासाठी आहे.

■ जाणून घ्या

याहून महत्त्वाचे म्हणजे सुधारित विवरणपत्राची मुदत चुकल्यानंतर आयटीआर-यू भरून राहिलेल्या टीसीएसमुळे नव्याने परतावा मागता येत नाही किंवा आधीचा परतावा वाढविता येत नाही. म्हणून टीसीएसचा दावा वेळेत करणे आवश्यक आहे. केवळ बँक स्टेटमेंट किंवा पावतीवर विसंबून न राहता २६एएस आणि एआयएसमधील पॅन, रक्कम, व्यवहाराची तारीख आणि संबंधित करनिर्धारण वर्ष तपासावे. ज्या मूळ व्यवहारावर टीसीएस आकारला गेला, त्या व्यवहाराची माहितीही आयटीआरमध्ये योग्य ठिकाणी नोंदवावी.

सुधारित विवरणपत्र भरल्यानंतर ई-व्हेरिफिकेशन करणे विसरू नये; अन्यथा विवरणपत्र वैध ठरत नाही. सुधारित विवरणपत्राची मुदतही संपली असेल आणि टीसीएस २६एएसमध्ये उपलब्ध असेल, तर कलम ११९(२)(ब) अंतर्गत विलंबमाफीसाठी सक्षम प्राप्तिकर प्राधिकरणाकडे अर्ज करण्याचा पर्याय परिस्थितीनुसार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे टीसीएसचा दावा राहिला म्हणजे पैसे बुडाले असे नाही; पण करदात्याने आपल्या २६एएस आणि एआयएसची वेळेत पडताळणी करणे हीच परतावा सुरक्षित ठेवण्याची सर्वांत सोपी खबरदारी आहे.

## करदात्यांसाठी सप्टेंबर महत्त्वाचा




आयकराशी संबंधित व्यवहार करणारे करदाते, व्यावसायिक आणि संस्थांसाठी सप्टेंबर २०२६ हा महत्त्वाचा महिना आहे. ७ सप्टेंबरपासून विविध करसंबंधित मुदती सुरू होत असून ३० सप्टेंबरपर्यंत टीडीएस, टीसीएस, ॲडव्हान्स टॅक्स आणि कर लेखापरीक्षणाशी संबंधित अनेक बाबी पूर्ण कराव्या लागणार आहेत.

● **७ सप्टेंबर : टीडीएस-टीसीएसकडे लक्ष :** ऑगस्ट २०२६ मध्ये कपात किंवा संकलित केलेला टीडीएस अथवा टीसीएस केंद्र सरकारकडे जमा करण्यासाठी ७ सप्टेंबर ही महत्त्वाची तारीख आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी आयकर चलनाशिवाय जमा केलेला टीडीएस किंवा टीसीएसही याच दिवशी सरकारकडे जमा करणे आवश्यक आहे. ऑगस्टमध्ये खरेदीदारांकडून प्राप्त झालेल्या संबंधित घोषणाही निर्धारित पद्धतीने अपलोड कराव्या लागतील.

● **१४ सप्टेंबर : टीडीएस प्रमाणपत्राची मुदत :** जुलै २०२६ मध्ये स्रोतावर कपात केलेल्या करासंबंधी निर्धारित टीडीएस प्रमाणपत्र जारी करण्यासाठी १४ सप्टेंबरची मुदत महत्त्वाची आहे. त्यामुळे संबंधित करदाते आणि कर कपात करणाऱ्या संस्थांनी ही बाब वेळेत पूर्ण करणे आवश्यक ठरेल.

● **१५ सप्टेंबर : ॲडव्हान्स टॅक्सचा दुसरा हप्ता :** करदात्यांसाठी सर्वाधिक महत्त्वाच्या तारखांपैकी एक म्हणजे १५ सप्टेंबर. कर वर्ष २०२६-२७ साठी ॲडव्हान्स टॅक्सचा दुसरा हप्ता या तारखेपर्यंत भरावा लागणार आहे. याशिवाय ऑगस्टमधील काही विशिष्ट व्यवहारांशी संबंधित विवरणपत्रे आणि सरकारी कार्यालयांसाठी टीडीएस-टीसीएसशी निगडित निर्धारित फॉर्म सादर करण्याची मुदतही याच दिवशी आहे.

● **३० सप्टेंबर : ऑडिटचे काम पूर्ण करा :** महिन्याच्या अखेरीस म्हणजे ३० सप्टेंबरलाही काही महत्त्वाच्या करविषयक जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतील. ऑगस्टमध्ये कपात केलेल्या काही प्रकारच्या करासाठी निर्धारित विवरणपत्र सादर करण्याबरोबरच कर लेखापरीक्षणाशी संबंधित मुदतीकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. आकलन वर्ष २०२६-२७ साठी ज्या कंपनी किंवा बिगर-कंपनी करदात्यांना कर लेखापरीक्षण लागू होते आणि ज्यांच्या प्राप्तिकर विवरणपत्राची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ आहे, त्यांच्यासाठी सप्टेंबरमध्ये ऑडिट रिपोर्टचे काम महत्त्वाचे ठरणार आहे. ट्रस्ट, फंड, रुग्णालये, विद्यापीठे तसेच अन्य शैक्षणिक किंवा वैद्यकीय संस्थांनाही लागू नियमांनुसार ऑडिट रिपोर्ट सादर करावा लागतो. करविषयक मुदत चुकल्यास व्याज, विलंब शुल्क किंवा इतर परिणामांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे ७, १४, १५ आणि ३० सप्टेंबर या तारखा आपल्या आर्थिक दिनदर्शिकेत नोंदवून संबंधित कामे शेवटच्या दिवसापर्यंत न ठेवणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

